रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १७ ◆ अंक २०३
www.ramprahar.com
शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

आंगणेवाडी जत्रेसाठी विशेष रेल्वेगाड्या/२
खालापूर तालुक्यातील तरुणांचा भाजपत प्रवेश/५
पेणमध्ये होणार इनडोअर क्रिकेट मैदान/८

## दिल्ली विधानसभा निवडणुकीचा आज निकाल



**नवी दिल्ली** : दिल्ली विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आणि निकाल शनिवारी (दि. ८) आहे. यामध्ये आम आदमी पक्ष चौथ्यांदा सत्तेत येणार की, भाजप २७ वर्षांनंतर राष्ट्रीय राजधानीत सरकार स्थापन करणार याकडे लक्ष आहे. गेल्या दोन निवडणुकांमध्ये दारूण पराभव पत्करल्यानंतर यंदा काँग्रेसचे राजधानीत काय होणार हेही पाहण्याजोगे असेल. दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकारी ॲलिस वाझ यांनी सांगितले की, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक, सूक्ष्म निरीक्षक आणि प्रक्रियेसाठी प्रशिक्षित सहाय्यक कर्मचाऱ्यांसह एकूण पाच हजार कर्मचारी मतमोजणीसाठी तैनात केले जातील. मतमोजणी प्रक्रियेची निष्पक्षता लक्षात घेता प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पाच व्हीव्हीपॅटची निवड केली जाईल. दिल्लीत बुधवारी ६०.५४ टक्के मतदान झाले होते. मतमोजणी प्रक्रिया सकाळी ८ वाजता सुरू होईल.

# जनहितासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा नेहमीच पुढाकार -मंत्री गणेश नाईक

## प्रशांत ठाकूर सद्गुणी आमदार, परेश ठाकूरही संस्कारी असल्याचे गौरवोद्गार





**खारघर : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर जनहितासाठी नेहमी पुढाकार घेतात आणि मुलांवर त्यांनी उत्तम संस्कार असल्याने आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर संस्कारी आहेत तसेच आमदार म्हणून काम करीत असताना प्रशांत ठाकूर ठामपणे बोलतात आणि त्यांच्यामध्ये कुठलाही अहंकार नाही. त्यामुळे ते सद्गुणी आमदार आहेत, असे गौरवोद्गार राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी गुरुवारी (दि. ६) रात्री खारघर येथे नमो चषक क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनावेळी केले.

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५चे आयोजन करण्यात आले असून त्या अंतर्गत खारघर सेक्टर १४ येथील जय हनुमान चेरोबा बापदेव मैदानावर भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा दिवस-रात्र स्वरूपात खेळली जात आहे. या स्पर्धेचे उद्घाटन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते आणि लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी ना. नाईक बोलत होते.

उद्घाटन समारंभास व्यासपीठावर भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, नमो चषकचे मुख्य आयोजक व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, स्थायी समितीचे माजी सभापती अमर पाटील, माजी सभापती व स्पर्धा संयोजक प्रवीण पाटील, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, गुरूनाथ गायकर, निलेश बाविस्कर, संजय घरत, प्रवीण बेरा, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, किरण पाटील, अंबालाल पटेल, संतोष शर्मा, गौरव नाईक यांच्यासह स्पर्धा संयोजक भारतीय जनता पक्ष खारघर व प्रवीण स्पोर्टस वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी, क्रीडारसिक उपस्थित होते.

या वेळी मंत्री गणेश नाईक पुढे बोलताना म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आखून दिलेली चौकट आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर कधीही विसरले नाही. त्यामुळे दोन्ही सुपुत्र गुणी आहेत. पैसा डोक्यात येतो तेव्हा तो माणूस अधोगतीकडे जातो, परंतु रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या दोन्ही मुलांच्या डोक्यात पैसा कधीच गेला नाही. त्यामुळे ते सर्व स्तरावर यशस्वी झाले आहेत. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी असतात; त्याचप्रमाणे रामशेठ ठाकूर यांचे चांगले संस्कार असल्याने मुलेही संस्कारी आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर नेहमी विधायक कार्य करत असतात. त्यामुळे त्यांच्या पाठीशी ताकदीने उभा असल्याचे ना. नाईक यांनी नमूद करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने हा नमो चषक आयोजित करून खेळाडूंना पर्वणी मिळाली आहे. विशेष म्हणजे भव्य आयोजन असतानाही नियोजनात कुठलाही भपका नाही, असे सांगत या स्पर्धेचे मंत्रीमहोदयांनी कौतुक केले. (पान २ वर..)



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा सत्कार

### पनवेलमध्ये संघटन पर्व आढावा बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा क्षेत्रातील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची संघटन पर्व आढावा बैठक पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. ६) झाली. या वेळी त्यांनी उरण मतदारसंघात सुरू असलेल्या सदस्य नोंदणीचा आढावा घेत या मोहिमेला अधिक गती देण्याच्या दृष्टीने प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्त्याने गावागावात आणि घराघरात जाऊन जनतेशी संवाद साधत त्यांना भाजप परिवारात सहभागी करून घ्यावे, असे आवाहन केले.

भाजपच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल आमदार रवींद्र चव्हाण यांचा या बैठकीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सत्कार केला. बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुण भगत, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, चारूशीला घरत, नितीन पाटील, दीपक बेहरे, पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, उरण तालुका सरचिटणीस रूपेश धुमाळ, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, मोतीराम ठोंबरे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी भाजप प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### एलओसीवरून घुसखोरी करणारे सात पाकिस्तानी दहशतवादी ठार

**श्रीनगर** : पाकव्याप्त काश्मीर (एलओसी) येथून भारतात घुसखोरीचा प्रयत्न करणारे सात पाकिस्तानी दहशतवादी भूसुरूंगाच्या स्फोटात ठार झाले आहेत. जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील बटाल सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ शुक्रवारी (दि. ७) ही घटना घडली.

### प्रयागराजकडे निघालेल्या आठ मित्रांचा अपघातात मृत्यू

**जयपूर** : उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यासाठी राजस्थानच्या मांडलगडमधून सहभागी होण्यासाठी निघालेल्या आठ मित्रांचा जयपूरजवळ रस्ता अपघातात मृत्यू झाला. या आठही जणांचे मृतदेह शुक्रवारी त्यांच्या मूळ गावी अंत्यविधीसाठी आणण्यात आले. त्या वेळी अनेकांच्या डोळ्यात पाणी आले.

## राहुल गांधींनी आत्मचिंतन करावे -मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल लागून आता दोन महिन्यांचा कालावधी उलटला आहे. त्यानंतरही पराभूत विरोधकांकडून निकालावरून आरोप सुरू आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी (दि. ७) नवी दिल्लीमध्ये पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. त्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चोख उत्तर दिले आहे.

राहुल गांधी यांनी शिवसेना 'उबाठा'चे खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार खासदार सुप्रिया सुळे या महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबत पत्रकार परिषद घेतली. या वेळी त्यांनी लोकसभेनंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी ३९ लाख मतदार वाढले तसेच मतदार यादीत गैरप्रकार झाले, असा आरोप केला.

यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विरोधकांच्या आरोपांवरील सर्व उत्तरे निवडणूक आयोगाने दिलेली आहेत. किती मतदार वाढले? ते कुठे वाढले? ते कसे वाढले हे निवडणूक आयोगाने सांगितलेले आहे. आता राहुल गांधींची जी तयारी चाललीय ती दिल्लीमध्ये प्रचंड मोठा त्यांचा पराभव होणार असल्यामुळे त्याचे कव्हर फायरिंग करण्याचा प्रयत्न ते करतायत. मी वारंवार सांगतो जोपर्यंत ते आत्मचिंतन करणार नाहीत आणि आपल्या मनाची खोटी समजूत करून घेतील तोपर्यंत जनतेचे समर्थन त्यांना कधीही मिळणार नाही.



## पनवेल पंचायत समितीची आमसभा

### नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीची सन २०२४-२५ची आमसभा शुक्रवारी (दि. ७) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली होती. उरणचे आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहअध्यक्षतेखाली ही आमसभा झाली.

या आमसभेत नागरिकांच्या समस्या, तक्रारींना प्राधान्य देत संपर्क, उत्तर आणि योग्य कारवाही करण्याचे निर्देश संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आले तसेच ग्रामीण रुग्णालय, परिवहन, जनसुविधा, नदी प्रदूषण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचा आढावा घेत आवश्यक त्या सूचना करण्यात आल्या.

या आमसभेला विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी तसेच पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

नमो चषक अंतर्गत

## आज कामोठ्यात रस्सीखेच स्पर्धा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ आयोजित करण्यात आला असून त्या अंतर्गत शनिवारी (दि. ८) सायंकाळी ४ वाजता कामोठे येथे रस्सीखेच स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश निःशुल्क असून विजेत्यांना भरघोस रकमेची बक्षिसे असणार आहेत.

कामोठे सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल मैदानावर ही स्पर्धा पुरुष व महिला अशा गटात होणार आहे. यामध्ये पुरुष गटातील प्रथम क्रमांक विजेत्या संघाला सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक, महिला गटातील प्रथम पारितोषिक सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, तर तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक तसेच प्रत्येक फेरीतील विजेत्या संघाला रोख एक हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप आहे.



# 'सर्व रुग्णालयातील औषधांची नवीन नियमावलीप्रमाणे गुणवत्ता तपासणी'



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सर्व आरोग्य संस्थामधील औषधाचा उपलब्ध साठा व गुणवत्ता याची नवीन नियमावलीप्रमाणे तपासणी करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी ई- बैठकीत दिले आहेत. जिल्हा ते राज्यस्तरापर्यंत सर्वत्र तातडीने ही मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व रुग्णालयांनी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवावा. औषध गुणवत्ता तपासणी मोहीम नवीन नियमावलीनुसार करावी. सर्व आरोग्य संस्थांनी खरेदी केल्यानुसार औषधाच्या नोंदी ई-औषधी प्रणालीमध्ये २४ ते ४८ तासांच्या आत घ्याव्यात, औषध साठ्याच्या समूह क्रमांकनिहाय नोंदी बिनचूक असाव्यात. खरेदी केलेल्या सर्व औषधींचे बॅचनिहाय नमुने N-BL प्रयोगशाळेत तपासणी करावी. कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी पुरवठादार कंपनी व प्रयोगशाळा यांचा संपर्क होणार नाही अशी व्यवस्था करावी. प्रत्येक औषधाचा प्रत्येक समूह क्रमांक तपासणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, औषध साठा प्राप्त झाल्यापासून तपासणी अहवाल विहित कालावधीत प्राप्त होईपर्यंत औषधसाठा स्वतंत्र ठेवण्यात यावा. अहवालानुसार प्रमाणित केलेल्या औषधांचा वापर करण्यास यावा. तसेच औषधे अप्रमाणित आढळून आल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिल्यास त्या औषधाचा तात्काळ वापर थांबवण्यात यावा या नियमावलीचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश आरोग्य मंत्र्यांनी दिले आहेत.

राज्यातील आरोग्य संस्थात पुरवठा होत असलेली औषधे प्रयोगशाळेत काटेकोर तपासून घ्यावीत. तसेच रूग्णाची गैरसोय होणार नाही यासाठी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवण्याचे निर्देश मंत्री आबिटकर यांनी दिले.

# पेणमध्ये वडिलांकडे आलेला मुलगा बेपत्ता

## फूस लावून पळवून नेल्याची वडिलांची तक्रार

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील तरणखोप येथून १५ वर्षीय टिंकू कुमार महतो हा मुलगा बेपत्ता झाल्याची घटना घडली असून त्याल फूस लावून पळवून नेल्याची तक्रार त्याचे वडील बरियार हुलास महतो याने पेण पोलीस ठाण्यात दिली आहे.



याबाबत माहिती अशी कि, फिर्यादी बरीआर हुलास महतो वय - ३८ सध्या रा. मुंगोशी दर्गावाडी ता. पेण मूळ गाव बोकारो, झारखंड हा सध्याच्या पत्यावर भाड्याच्या घरात एकटा राहत असून त्याची पत्नी आणि मुले गावाला राहतात. १५ जानेवारी रोजी त्याचा मुलगा गावाहून पेण येथे काही दिवसांकरीता फिरण्यासाठी आला होता. मुलगा टिंकुकुमार दोन दिवस त्याच्याजवळ राहिला व त्यानंतर त्याचा नातेवाईक सोमनाथ महातो रा. लक्ष्मी हॉटलच्या पाठीमागील चाळ, तरणखोप, ता.पेण जि. रायगड येथे राहण्यासाठी गेला.

दिनांक २ फेब्रुवारी रोजी फिर्यादी व त्याचा मुलगा टिंकू कुमार हे दोघे दर्गावडी मुंगोशी येथून आले असता फिर्यादीने त्याच्या मुलगा टिंकू कुमार यास तरणखोप येथे सोडून सोमनाथ महातो यांना त्यांचे मोबईलवर कॉल करून कळविले होते. त्यानंतर ते कामासाठी निघून गेले. रात्रीच्या टिंकुकुमार सोमनाथ महतो याच्या घरी पोहचला नव्हता यासाठी सर्वानी त्याचा शोध घेतला परंतु तो कुठेच मिळाला नाही यामुळे बरिआर महतो याने पेण पोलीस ठाण्यात आपल्या मुलाला पळवून नेल्याची तक्रार दाखल केली.

टिंकू कुमारचा वर्णन रंग सावळा, अंगाने सडपातळ, चेहरा उभा, केस काळे, नाक-सरळ, उंची ५ फूट, अंगात नेसुस-फूल बाहयंचा मरून रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फूल पॅन्ट असे असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर करीत आहेत. वरील वर्णनाची व्यक्ती कुठे आढळ्यास पेण पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आंगणेवाडी जत्रेसाठी मुंबई ते सावंतवाडीदरम्यान विशेष रेल्वेगाड्या



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे आंगणेवाडी जत्रेदरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन लोकमान्य टिळक टर्मिनस-सावंतवाडी रोडदरम्यान चार विशेष गाड्या चालवणार आहे.

विशेष चालवण्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये अ) लोकमान्य टिळक टर्मिनस-सावंतवाडी रोड विशेष (२) ट्रेन क्रमांक ०११२९ ही विशेष ट्रेन दि. २१.२.२०२५ (शुक्रवार) रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ००.५५ वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे त्याच दिवशी १२.०० वाजता पोहोचेल. ट्रेन क्रमांक ०११३० ही विशेष ट्रेन दि. २१.२.२०२५ (शुक्रवार) रोजी १८.०० वाजता सावंतवाडी रोड येथून सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१० वाजता पोहोचेल.

ब) लोकमान्य टिळक टर्मिनस - सावंतवाडी रोड विशेष (२) ट्रेन क्रमांक ०११३१ विशेष ट्रेन दि. २२.२.२०२५ (शनिवार) रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ००.५५ वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे त्याच दिवशी १२.०० वाजता पोहोचेल.ट्रेन क्रमांक ०११३२ विशेष ट्रेन दि. २२.२.२०२५ (शनिवार) रोजी १८.०० वाजता सावंतवाडी रोड येथून सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१० वाजता पोहोचेल.

या गाडींना ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ हे थांबे देण्यात आले आहेत.

गाडी क्रमांक ०१२२९, ०११३०, ०११३१ आणि ०११३२ या क्रमांकांसाठी विशेष शुल्क आकारून बुकिंग दि. ९.२.२०२५ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in संकेतस्थळावर सुरू होईल

# प्रसिद्ध जत्रा दर्शविणाऱ्या वॉल कॅलेंडरचे प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

पर्यटनमंत्री श्री शंभुराजे विजयादेवी शिवाजीराव देसाई यांनी महाराष्ट्रातील प्रसिद्ध आणि लोकप्रिय जत्रा दर्शविणाऱ्या वॉल कॅलेंडरचे प्रकाशन केले.

या प्रसंगी मंत्री शंभुराजे विजयादेवी शिवाजीराव देसाई यांनी या विषयगत कॅलेंडरची रचना करण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि म्हणाले की, अशा प्रकारच्या कामांमुळे महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा जपण्यास मदत होते, राज्याच्या विविध भागांमध्ये जत्रांची जी परंपरा आहे ती महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासात आणि एकत्रीकरणात खूप मोठी भूमिका बजावते.

महाराष्ट्राच्या या समृद्ध आणि शाश्वत संस्कृतीचे जतन करण्याच्या उद्देशाने मौलिस ॲडव्हर्टायझिंगने हे कॅलेंडर डिझाइन केले आहे. ही दिनदर्शिका एक उत्तम ठेवा ठरेल.



# स्कुटी डिलेव्हरी न करता पैसे मागणाऱ्या आरोपीस अटक

**पनवेल : वार्ताहर**

यामहा रे कंपनीच्या स्कुटीची डिलेव्हरी कोईंबत्तुर येथे न करता कुरिअरच्या वाढीव पेमेंट तसेच मालाच्या इन्शुरन्स व गोडावूनचे भाडे वगैरे करता वेगवेगळ्या कारणाने पैसे मागणार्या डिलेव्हरी कंपनीविरोधात संबंधित गाडीच्या मालकाची फसवणूक करणार्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे ताब्यात घेवून अटक केली आहे.




आर.रेवती यांच्या तक्रारीनुसार त्यांचे पती हे एम.महेशकुमार यांच्याकडे यामहा रे कंपनीची स्कुटी ही कुरिअरने पाठविण्याकरिता गुगलवर सर्च करीत असताना शिफ्टींग बाजार यांच्याकडून सुचविण्यात आलेल्या बाबा कार्गो पॅकर्स ॲण्ड मुव्हर्स ज्याचे मालक म्हणून काम पाहणारे नरेश शर्मा (प्रदीप शर्मा) यांचे मोबाईलवर त्यांनी संपर्क केला असता पार्सल करीता दिलेल्या २५ हजार रुपये किंमतीची यामहा रे कंपनीच्या स्कुटीची डिलेव्हरी कोईंबत्तुर येथे न करता कुरिअरच्या वाढीव पेमेंट तसेच मालाचे इन्शुरन्स व गोडावूनचे भाडे वगैरे अशा वेगवेगळ्या कारणाने त्यांच्या तसेच कडून १६६५०/- रुपये गुगल पे द्वारे पाठविण्यास सांगून आर.रेवती यांची फसवणूक केल्याबद्दल पनवेल शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली होती.

त्यानुसार वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कदम व त्यांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे सदर आरोपीचा शोध घेतला असता आरोपी प्रदीप पवनकुमार शर्मा (३६) हा तळोजा खुटारी परिसरात लपल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरोधात अटक कारवाई करण्यात आली आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात बोगस डॉक्टरांवर कारवाई होणार

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात बोगस डॉक्टरांची वाढती संख्या नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहे. काही गावांमध्ये लहान क्लिनिक उभारून, काही डॉक्टर कोणतेही रजिस्ट्रेशन न करता अवैधपणे उपचार करत आहेत, ज्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची मोठी शक्यता आहे. याबाबत धवल तवसाळकर यांनी संबंधित सरकारी यंत्रणा आणि अधिकाऱ्यांकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या समस्येची जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांनी दखल घेतली आहे. त्यांनी संबंधित खासगी वैद्यकिय व्यावसायिकांची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिनकडून डॉक्टरांचे प्रमाणपत्र तपासणीसाठी पाठवून त्यावर योग्य कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे दोषी डॉक्टरांना कायदेशीर प्रक्रियेच्या कक्षेत आणणे शक्य होईल.

पान १ वरुन

## जनहितासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा नेहमीच पुढाकार -मंत्री गणेश नाईक

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून गावांना आवश्यक मैदानाचा विषय मांडला होता. त्याचा धागा पकडून मंत्री नाईक यांनी गावांकरिता आवश्यक असलेले भूखंड सिडकोकडून घेऊ. असे आश्वासित केले. सिडको व्यापार नाही तर विकास करणारी संस्था आहे त्यामुळे त्यांनी विकासावर भर द्यावा असे सांगत या वेळी त्यांनी मैदानांचा संदर्भ घेत सिडकोच्या अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढले. मी कधीही कुणाचा अवमान करत नाही, पण सिडकोमध्ये काही अधिकारी लायकी नसलेले आणि भ्रष्ट असल्याचा घणाघात त्यांनी केला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात मंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबईच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेत नवी मुंबईचे शिल्पकार असल्याचे अधोरेखित केले. मैदान गावांची अस्मिता आहेत. त्यामुळे प्रत्येक गावाला किमान एक तरी मैदान असावे असा आग्रह आम्ही सिडकोकडे धरला आहे आणि त्यासाठी मंत्री गणेश नाईक यांचे पाठबळ मिळावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. स्पर्धेविषयी बोलताना खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा यासाठी सतत अशा स्पर्धांचे आयोजन केले जात असून खेळ आणि खेळाडूंच्या विकासासाठी यापुढेही काम करत राहू, असे त्यांनी खेळाडूंना आश्वासित केले.

६ ते ९ फेब्रुवारीपर्यंत ही स्पर्धा होत असून या स्पर्धेतील विजेत्या संघाला एक लाख ११ हजार १११ रुपये, उपविजेत्यास ५५ हजार ५५५ रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या संघास ३३ हजार ३३३ रुपये तसेच मॅन ऑफ दि सिरीजला मोटरसायकल अशी भरघोस पारितोषिके असून दररोज प्रेक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या लकी ड्रॉमध्ये एक सायकलसुद्धा बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत कानपोली, दापोली, मुर्बी, पेठ, बामणडोंगरी, कुंडेवहाळ, कामोठे, ओवळे, बापदेव पोदी, भैरवनाथ विचुंबे, स्व. महादेव पेठाली, अथर्व इलेव्हन घोट, गावदेवी भाताणपाडा, हिमांशू वळवली, मंगलमूर्ती घरकुल, जय हनुमान नावडे, यंगस्टार वहाळ, जिवा इलेव्हन पेंधर, धाकटा खांदा, शनिकृपा कोपरा, शिवशक्ती खारघर, श्रीराम शिरढोण, उलवा आणि ओम साई भंगारपाडा या नामवंत खेळाडूंचा भरणा असलेल्या २४ संघांचा सहभाग आहे.

# अंगणवाडी सेविका आणि मदतनीस उमेदवारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये -आयुक्त कैलास पगारे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या विभागाच्या अधिनस्त १०४ नागरी प्रकल्प कार्यालयातील गट क संवर्गातील मुख्यसेविका (नागरी प्रकल्प) सरळसेवा कोटयातील पदभरतीसाठी अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, फसवणुकीला बळी पडू नये, असे आवाहन एकात्मिक बाल विकास सेवा योजना नवी मुंबईचे आयुक्त कैलास पगारे यांनी केले आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या विभागाच्या गट क संवर्गातील मुख्यसेविका (नागरी प्रकल्प) सरळसेवा कोटयातील एकूण १०२ रिक्त पदभरती प्रक्रीया पारदर्शकपणे पार पडण्यासाठी सुरक्षितेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या आवश्यक त्या उपायोजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना



कार्यालय, रायगड भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ही सरळसेवा भरती प्रक्रिया सुरक्षीत आणि पारदर्शी असून ही कॉम्पुटरबेस वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा टी. सी.एस-आय. ओ.एन. कंपनी मार्फत विविध परीक्षा केंद्रावर वेगवेगळ्या शिफ्टमध्ये आयोजीत करण्यात आलेली आहे. ऑनलाईन परीक्षेचे वेळापत्रक व उमेदवारांसाठी आवश्यकत्या सूचना आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. मुख्यसेविका पदासाठी ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी दि. ८ फेब्रुवारीपासून ऑनलाईन हॉलटिकिट उपलब्ध करून देण्यासाठी रजिस्टर मोबाईलवर सूचना देण्यात येतील.

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक परीक्षा केंद्रावर टी.सी.एस. मार्फत परीक्षा केंद्र समवेक्षक व पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात येते तसेच या आयुक्तालया मार्फत परीक्षा केंद्र निरिक्षक यांची नेमणूक करण्यात येत आहे. एकूण ७६ सर्व परीक्षा केंद्रावर सिग्नल जॅमरची व्यवस्था करण्यात आलेली असून त्याच्या माध्यमातून परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. अंगणवाडी सेविका व मदतनिस यांच्या रिक्त पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन केले.

# कल्याण व भांडुप परिमंडलात अभय योजनेतून प्रकाश

**कल्याण : प्रतिनिधी**

थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित केलेल्या ग्राहकांसाठी महावितरणने आणलेल्या अभय योजनेचा लाभ घेणाऱ्या कल्याण व भांडुप परिमंडलातील ७ हजार ८९१ ग्राहकांना पुन्हा वीजजोडणी मिळाली. या दोन्ही परिमंडलातील १३ हजार ८४८ ग्राहकांनी योजनेत सहभाग घेत ३० कोटी ६२ लाख रुपयांच्या थकबाकीचा भरणा केला. त्यांना थकीत रकमेवर विलंब आकार व व्याजमाफीसह मूळ थकबाकीत ५ ते १० टक्क्यांची सवलत मिळाली. येत्या मार्च अखेरला योजनेची मुदत संपत असून लाभापासून वंचित दोन्ही परिमंडलातील उर्वरित ग्राहकांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करून संधीचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

अभय योजनेनुसार मार्च-२०२४ अखेर किंवा तत्पूर्वी वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेले लघुदाब व उच्चदाब ग्राहक योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. थकबाकीची मुळ रक्कम एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पुर्णतः माफ़ होईल. तर थकबाकी एकरकमी भरणाऱ्या उच्चदाब ग्राहकांना मूळ थकबाकीवर ५ टक्के आणि लघुदाब ग्राहकांना १० टक्के अतिरिक्त सवलत मिळत आहे. मूळ थकबाकी एकरकमी अथवा ३० टक्के रक्कम भरुन योजनेत सहभागी होता येईल.

कल्याण परिमंडलातील ९ हजार ५७८ ग्राहकांनी अभय योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज केला आहे. यातील ८ हजार ३९४ ग्राहकांनी आत्तापर्यंत १५ कोटी ४१ लाख रुपयांचा भरणा केला असून त्यातील मागणी करणाऱ्या ५ हजार २५० जणांना पुन:जोडणी अथवा नवीन वीजजोडणी देण्यात आली आहे. तर भांडुप परिमंडलातील ५ हजार ९७० ग्राहकांनी अभय योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज केला आहे.

यातील ५ हजार ४५४ ग्राहकांनी आत्तापर्यंत १५ कोटी २१ लाख रुपयांचा भरणा केला असून त्यापैकी २ हजार ६४१ जणांना त्यांच्या मागणीप्रमाणे पुन:जोंडणी किंवा नवीन वीजजोडणीची मागणी केली आहे.

# कामोठे येथे महिलांसाठी अनोखा हळदीकुंकू कार्यक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील कराडी हॉलमध्ये शनिवार (दि. ६) या ढोलकीच्या तालावर आणि हळदीकुंकूचा थाट खास 'ती' च्या अस्तित्वासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे नेहमीप्रमाणेच हळदी कुंकूची सुरुवात विधवा महिला व एल.जि.बी. टी. यांना हळदी कुंकवाचा मान देऊन करण्यात आली.

पूर्वापार चालत आलेल्या रुढीला बाजूला सारून सर्वसामान्य स्त्री प्रमाणे तिलाही समाजात तोच मानसन्मान मिळावा हीच भावना ठेऊन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हळदी कुंकूचे आयोजन दिशा व्यासपीठामार्फत करण्यात आले होते शिवशाही सेना (कामगार संघटना) संस्थापक राजकुमार पाटील व राजश्री पाटील यांच्या सहकार्याने तसेच साई द्वारका क्लीनिक व नर्सिंग होमचे डॉ हेमंत पाटील, यशोदा हॉस्पिटलचे डॉ स्नेहलता व डॉ बाळासाहेब खडबडे यांचे सहकार्य दिशा व्यासपीठास मिळाले.

शुभांगी कलेक्शनच्या शुभांगी पाटील स्वीट एंजेल प्रि स्कूलच्या मंदाकिनी पाटील यांच्या कडून महिलांना वाण देण्यात आले तसेच हरेश्वर ज्वेलर्सकडून लकी ड्रॉसाठी सोन्याची नथ व १ ग्रॅम गोल्ड नेकलेस देण्यात आला पैठणी मनीषा घोटणे यांनी दिली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कामोठेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, सहाय्यक निरीक्षकप्रियंका खरटमोल तसेच इंदू झा, मोहिनी पाटील, स्नेहल पाटील उपस्थित होत्या. दिशा संस्थापक निलम आंधळे यांनी प्रास्ताविक केले. महिला सबलीकरण व सक्षमीकरणासाठीच्या कार्यात नेहमी दिशा सोबत आहे, असे आश्वासन राजकुमार पाटील यांनी दिले.

ढोलकीच्या तालावर महिलांनी काही परफॉर्मन्सदेखील केले. नृत्यांगना मिताली पाटील खास या सदाबहार लावणीसाठी उपस्थित होत्या.

# खालापुरात बैल वाहतूकप्रकरणी गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

गोवंशीय बैल टेम्पोत भरुन त्याला चारा पाण्याची व हालचाल करता येईल तसेच पुरेसी हवा येईल अशी कोणत्याही प्रकारे सोय न केल्याने खालापुरात गुन्हा दाखल झाला आहे.

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत खोपोली पेण मार्गावर शिरवली गावचे हददीत छोटा हत्ती टेम्पो एमएच ४३ बीपी ७२७४मध्ये एक गोवंशीय बैल भरुन विनापरवाना त्यांना त्रास होईल असे कृत्य करुन, वाहतुक करीत असतांना आढळून आल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१चे कलम ११९, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यांस प्रतिबंध अधिनियम १९६०चे कलम ११(१) ड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार चंदा गायकवाड करीत आहेत.

## दुखवटा

### सोनाबाई पाटील



**खोपोली :** भारतीय जनता पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील तसेच माजी नगरसेवक सदाभाऊ पाटील यांच्या मातोश्री सोनाबाई हरिभाऊ पाटील यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ९६व्या वर्षी निधन झाले. त्यांचे दशक्रिया विधी ताकई येथे १३ फेब्रुवारी, तर उत्तर कार्य १६ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी योजले आहे.

आमदार व भाजप नेते प्रशांत ठाकूर यांनी अश्विनी पाटील यांचे सांत्वन केले. याप्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहरे, इत्यादीसह जिल्हाभरातील वरिष्ठ नेते व स्थानिक नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यायालयाच्या निर्णयानंतर पनवेल महापालिकेची निष्कासन कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील टपाल नाका येथे रस्ता रूंदीकरणासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण उपायुक्त रविकिरण घोडके व प्रभाग ड पनवेलच्या सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि. ७) नऊ गाळ्यांवर निष्कासन कारवाई करण्यात आली.

जेसीबी, डंपर, पोकलच्या साहाय्याने सुमारे दोन हजार ३६ स्वेअर फूट बांधकामांवर अतिक्रमण विभागाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे अनेक वर्षापासूनचा टपाल नाक्यावरील रस्ता रूंदीकरणाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे. जेसीबीच्या साहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली.



या वेळी सहाय्यक संचालक नगर रचना केशव शिंदे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर तसेच प्रभाग अधिक्षक सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, प्रभारी अधीक्षक अरविंद पाटील, महापालिकेचे अधिकारी सुधीर साळुंखे, राजेश कर्डिले, प्रितम पाटील, संदीप पवार तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते तसेच पनवेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजरत्न खैरनार, वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील व कर्मचारी उपस्थित होते.

टपाल नाका येथे दिवसेंदिवस वाहतुकीची कोंडी वाढू लागल्याने या ठिकाणी रस्ता रूंदीकरण करणे महत्वाचे होते. याबाबत मुंबई उच्च न्यायालयात दोन रिट याचिका सादर करण्यात आल्या होत्या. ६ फेब्रुवारी रोजी मुंबई उच्च न्यायालयाने सदर दोन्ही याचिका सुनावणी अंती फेटाळून लावली. त्यामुळे रस्ता रूंदीकरण कामात अडथळा येणाऱ्या नऊ गाळ्यांवर शुक्रवारी पालिकेच्या वतीने जेसीबीच्या साहाय्याने मोठी निष्कासन कारवाई करण्यात आली. त्यामुळे येथील रस्ता रूंद होऊन वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

**वॉटर कॅनॉनचा वापर**

निष्कासनप्रसंगी धूळ प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने पालिकेने वॉटर कॅनॉनचा या वेळी वापर केला. नागरिकांना धुळीचा त्रास होऊ नये तसेच कमीत कमी धूळ प्रदूषण व्हावे याकरिता निष्कासन कारवाईदरम्यान या वॉटर कॅनॉनचा वापर करण्यात आला.

# रक्षकच ठरले भक्षक!

## सुरक्षा रक्षकांकडून कंपनीत चोरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्रातील कराडे बुद्रुक गावाच्या हद्दीत प्लॉट नं. एन २९, ३० येथे असणाऱ्या बी.जे. एंटरप्रायझेस कंपनीमध्ये सुरक्षा रक्षकांनीच कंपनीतील मशिनरीचे पार्ट चोरून नेल्याची घटना घडली .

गुन्हे

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बीजी एंटरप्रायझेस कंपनीमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने कार्यरत असलेल्या एक्सलंट गार्ड फोर्स या सिक्युरीटी फोर्स एजन्सीचे सुरक्षा रक्षक आरोपी राजेश झा, रजनीश झा व अनिलेश राय (सर्व राहणार बिहार) या तिघांनी संगनमत करून व आपल्या कंपनी रक्षणाचा गैरफायदा घेवून कंपनीमध्ये पीडीलाईट इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीत ठेवण्यात आलेले १५ लाख २५ हजार रूपये किंमतीचे साहित्य व मशिनरीचे पार्ट चोरून नेले आहेत.

याबाबत जेरोम जॉन (चीफ ऑपरेटींग बीजी एंटरप्रायझेस यांनी रसायनी पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पाटील अधिक तपास करीत आहेत

# स्वातंत्र्यसेनानींच्या वारसदारांचा सन्मान

## पनवेल महानगरपालिकेचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महानगरपालिकेच्या अभिनव उपक्रमांतर्गत स्वांतत्र्यवीरांचे उत्तराधिकारी सीमा परांजपे यांना महापालिकेच्यावतीने नुकतेच त्यांची ध्वजारोहण प्रसंगीची फोटोफ्रेम सस्नेह भेट व आभार पत्र त्यांच्या घरी जाऊन सन्मानाने सुपूर्द करण्यात आले.

पनवेल शहरातील हुतात्मा स्मारक येथे प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, महाराष्ट्र दिन स्वातंत्र्य सेनानींच्या वारसदारांच्या शुभहस्ते ध्वजवंदन, ध्वजारोहण केले जाते. त्यानुसार यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनी स्वांतत्र्यवीरांचे उत्तराधिकारी सीमा परांजपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले होते. याप्रसंगी पनवेल महापालिकेतर्फे स्वातंत्र्य सेनानींच्या वारसदारांचा यथोचित सन्मान करण्यात यावा, अशी सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. त्यास अनुसरून आयुक्त मंगेश चितळे यांच्या कल्पनेनुसार महापालिकेने अभिनव उपक्रम राबवण्यास सुरूवात केली आहे.

या अभिनव उपक्रमांतर्गत स्वांतत्र्यवीरांचे उत्तराधिकारी सीमा परांजपे यांना महापालिकेच्यावतीने नुकतेच त्यांची ध्वजारोहण प्रसंगीची फोटोफ्रेम सस्नेह भेट व आभार पत्र त्यांच्या घरी जाऊन सन्मानाने सुपूर्द करण्यात आले.

या वेळी उपायुक्त प्रसेनजित कारलेकर,सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी उपस्थित होते. या अभिनव उपक्रमाचे परांजपे यांनी कौतुक करून आभार मानले.

# काळजी घ्या! कामोठ्यात रस्ता सुरक्षतेविषयी प्रबोधनात्मक कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

आरटीओ पनवेल, महाराष्ट्र आम्ही एकत्र श्रमिक संघटना, ओमकार मोटर ट्रेनिंग स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान २०२५चे औचित्य साधून काळजी घ्या हा रस्ता सुरक्षते विषयी प्रबोधनात्मक कार्यक्रम ओमकार मोटर ट्रेनिंग स्कूल कामोठे येथे घेण्यात आला. या कार्यक्राचे उदघाटन विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांच्याहस्ते झाले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्या करीता जॉइंट कमिशनर महाराष्ट्र राज्य जयंत पाटील, डेप्युटी आरटीओ पनवेल जयंत चव्हाण, महाराष्ट्र आम्ही एकत्र श्रमिक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर अण्णा यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मार्गदर्शन केले, तसेच ओमकार ट्रेनिंग स्कूलच्या संचालिका शिल्पा नितिन मावळे, शेखर भागवत, श्रिया नितिन मावळे व त्यांचे कुटुंबीय , पूर्ण स्टाफ यांनी अथक परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे आमदार विक्रांत पाटील, निलेश धोटे, श्री. नांदकर, अशोक वारे, काकडे, विजया चामे, संघटनेचे उपाध्यक्ष विवेक खाडये, सचिव सुजित भगत, कार्याध्यक्ष सतिष आचार्य, सहखजिनदार अभिजित लगड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# एका दिवसात मिळणार दाखले!

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तहसीलच्या सेतू केंद्रात शासनाने निर्देशित केलेले कागदपत्र जमा केल्यावर एका दिवसात अधिवास, उत्पन्न आणि जेष्ठ नागरिकत्व असे तीन दाखले देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पंधरा दिवसांपासून हा उपक्रम पनवेल तहसील कचेरीच्या नव्या इमारतीमध्ये राबविला जात आहे. ४०० दाखले एका दिवसात देण्यात आले आहेत.पनवेलचे अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी सांगितले

राज्य शासनाने १०० दिवसांच्या काळात सात कलमी लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या सूचना शासनाच्या प्रत्येक कार्यालयाला दिल्या आहेत, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबत पनवेल तहसील कार्यालयाला सूचना दिल्यानंतर अप्पर तहसीलदार इंगळे यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार संभाजी शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली एका दिवसात दाखला वितरण हा उपक्रम राबविला. दाखल्यांना लागणारे पुराव्याची कागदपत्र व्यवस्थित द्यावी या कागदपत्रांची तपासणी केल्यावरच दाखल्यांचे वाटप केले जात आहे.

एका दिवसात दाखला वितरणासोबत जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलिअर यांसारखे दाखले सात दिवसांत नागरिकांना सेतू केंद्रातून देण्याच्या सूचना अप्पर तहसीलदार इंगळे यांनी दिल्या आहेत. पनवेल तालुक्यातील १०५ गावांसाठी अप्पर तहसीलदार यांचे कार्यालय नवीन इमारतीमध्ये सुरू आहे.



**पनवेल : वाकडी येथील सर्व महिला मंडळांच्या वतीने आयोजित श्री सत्यनारायण महापुजेचे भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. सोबत माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, वाकडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रल्हाद खुटले, नरेश पाटील, धनंजय पाटील, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.**

# मतिमंद मुलांना ब्लॅकेट व फळवाटप




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील पाताळगंगा नदी व पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने तारांगण मतिमंद मुलांची निवासी शाळा शिरवली येथील विद्यार्थ्यांना ब्लँकेट व फळेवाटप केले.

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट सामाजिक व क्रीडा पर्यावरण संदर्भात व पर्यांवरण संतूलन राखण्यासाठी प्लास्टिक बंदी असे उपक्रम राबवून जिल्ह्यासह खालापूर तालुक्यात ठिकठीकाणी कापडी पिशव्यांचे वाटप ट्रस्टच्या वतीने केले जाते.

या वेळी अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी व पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, विकास म्हारसे अध्यक्ष तारांगण मतिमंद मुलांची निवासी शाळा मुरबाड, संकेत पडवळ,शिक्षक रोहित इंगळे ,दिगंबर गायकवाड आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल : करंजाडे सेक्टर ६ मधील एक्सेल्लेंझा सोसायटीत बांधण्यात आलेल्या मंदिरात श्री गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा ५ ते ७ फेब्रुवारी रोजी करण्यात आला. सोसायटीचे सदस्य अमोल आणि करिश्मा शिंदे यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. या वेळी लालजी यादव, डॉ. बाळासाहेब सुकने, वैभव क्षीरसागर, अंकुर टंडन, विजय सावंत, राजेश पाटील, तुकाराम पाटील, सीताबाई पाटील, कुलदीप सिंग, प्रमोद शिकारे, ॲड. कपिल गोंधळी, शोभा पाटील, रणधीरकुमार यादव आदी उपस्थित होते.**

# पोलिसांकडून विद्यार्थ्यांना कायदेविषयक प्रशिक्षण आणि सायबर गुन्हे जनजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय आणि पनवेल तालुका पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ येथे नवीन कायदेविषयक प्रशिक्षण शिबिर आणि सायबर गुन्हे जनजागृती कार्यक्रम दिनांक ७ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले होते .

सध्या वाढत असलेल्या सायबर गुन्हे ही मोठी समस्या आपल्या समोर आहे, यासाठी नवी मुंबई पोलीस यांनी जोरदार मोहीम चालू केली आहे, अनेक गुन्ह्यांची उकल ही नवी मुंबई पोलीस यांनी केली आहे. यासाठी सामाजिकदृष्ट्या लोकांना तसेच तरुण पिढीला मार्गदर्शन करणे हे गरजेचे आहे हे ओळखून छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसमध्ये जनजागृती कार्यक्रम घेऊन जास्तीत जास्त तरुण तरुणींना मार्गदर्शन करण्यात आले




या साठी पोलीस निरिक्षक आनंद कांबळे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गौरव इंगोले यांनी मार्गदर्शन केले.त्याच प्रमाणे नवीन कायदे विषयी माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवणे हे ध्येय घेऊन सरकारी वकील सी वाय पाटील आणि इतर मान्यवर यांनी शिबिरामध्ये मार्गदर्शन मोलाचे मार्गदर्शन केले. कायदेविषयक ज्ञान असणे ही काळाची गरज आहे आणि प्रत्येक जण कायदेविषयी अद्ययावत असणे महत्त्वाचे आहे, असे मत सी. वाय. पाटील यांनी व्यक्त करून युवकांना कायदे विषयक शिक्षण साठी प्रोत्साहन दिले. सेंट विल्फ्रेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकेश सोनी यांनी पाहुण्यांचे शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले.

या शिबिरासाठी जवळपास ७०० ते ७५०विद्यार्थांनी उपस्थिती लावली. सदर शिबिराचे नियोजन विधी विभागचे विभाग प्रमुख एस.पी. मिश्रा,राकेश जुन्नरकर यांनी आणि सूत्रसंचालन डॉ.पियूष माहेश्वरी यांनी केले.

# बिरमोळे रुग्णालयात आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बिरमोळे मेडिकल फाउंडेशन यांच्या सहकार्याने सिटिझन्स युनिटी फोरम (कफ) या सेवाभावी सामाजिक संस्थेमार्फत रविवार दि.९ फेबुवारी २०२५ रोजी कफनगर पनवेल येथील बिरमोळे रुग्णालयात आरोग्य शिबिराचे अत्यल्प मूल्य आकारून आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात विविध रक्त चाचण्या,हृदय स्पंदन आलेख, छातीची क्ष-किरण तपासणी,अस्थी घनता चाचणी, दमा आजाराविषयीची चाचणी, डोळे, दात, नाक, कान, घसा इत्यादी चाचण्या करण्यात येणार आहेत. या शिबिरास उपस्थित रहाण्याचे आवाहन केले आहे.

# ‘सरगम लायन्स’तर्फे नेत्र तपासणी शिबिर

**पनवेल: वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे नुकतेच आयरिस नेत्र रुग्णालय आणि एस पी मोरे कॉलेज ऑफ पॅरामेडिकल सायन्स यांच्या सहकार्याने नवीन पनवेल मधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात मराठी आणि इंग्रजी माध्यमातील प्री प्रायमरी पासून उच्च माध्यमिक वर्गातील सुमारे १८०० विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये डॉ.मानसी मोरे यांच्या टीमने नेत्र तपासणी, रंग आंधळेपणा तपासणी केली. दोन दिवस चाललेल्या या शिबिराला प्रांतपाल एन आर परमेश्वरन, जी एस टी चेअरमन विजय गणात्रा, रिजन चेअरमन सुयोग पेंडसे, झोन चेअरमन अल्केश शहा, एक्झिक्युटिव्ह डि. कॅब. सेक्रेटरी संजय गोडसे यांनी भेट दिली.

ज्या मुलांना डोळ्याच्या समस्या जाणवल्या त्यांना डॉ. मानसी मोरे यांनी मार्गदर्शन केले. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित, स्वाती गोडसे, संध्या महानुभाव, आदित्य दोशी, मिलिंद जोशी, जयेश मणियार, एस पी मोरे कॉलेजचे सतीश मोरे तसेच फडके विद्यालयाच्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.




## संपादकीय

# सोन्याला पसंती!

मागील वर्षात भारतात सोन्यातील गुंतवणूक २९ टक्क्यांनी वाढली असून २०२४ हे वर्ष देशातील सोन्याच्या बाजारपेठेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. या काळात देशातील सोन्याची एकूण मागणी ८०२.८ टन झाली व २०२३च्या तुलनेत तीत पाच टक्के वाढ दिसून आली. जगभरात आर्थिक अनिश्चिततेतून निरनिराळ्या देशांच्या मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी करत असून त्याचीही पार्श्वभूमी या वाढत्या मागणीला आहे. केंद्र सरकारने सोन्यावरील आयात शुल्क कमी केल्यामुळेही लग्नसराईत सोन्याची मागणी वाढल्याचे दिसून आले.

**गेले काही दिवस सोन्याचे भाव रोज नवे विक्रम करत आहेत. गेल्या दोन दिवसांत सोन्याचा भाव वाढून देशातील निरनिराळ्या शहरांत प्रति दहा ग्रॅमला सुमारे ८५ हजार ते ८७ हजार रुपयांच्या दरम्यान तो दिसला. गेल्या वर्षभरात तर सोन्याच्या भावात अनेकदा विक्रमी वाढ दिसली, मात्र तरीही त्याची मागणी कमी झाली नाही. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलने अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या अहवालात २०२४मध्ये भारतातील सोन्याची मागणी पाच टक्क्यांनी वाढून ८०२.८ टन झाल्याचे म्हटले आहे. चालू वर्षातही लग्नसराईत सोन्याची मागणी आणखी वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. भारतात २०१३पासून सोन्यातील गुंतवणूक वाढत गेली आहे. २०२४मध्ये सोन्यातील गुंतवणूक २९ टक्के वाढली आणि २३९.४ टनांवर गेली. हा आकडा २०१३पासूनच्या आकड्यांशी तुलना करता सर्वाधिक आहे. २०२३मध्ये सोन्यातील गुंतवणूक १८५.२ टन इतकी होती. एकंदरीत आजही लोकांना सोन्यातील गुंतवणूक अतिशय सुरक्षित वाटते असेच यातून स्पष्ट होते. त्यामुळेच भारतीयांचे सोन्यावरचे प्रेम वाढत्या किमतीकडे दुर्लक्ष करून वाढतच जाताना दिसते आहे. आजची जागतिक पातळीवरची आर्थिक अनिश्चितताही यास कारणीभूत आहे. जगभरातील निरनिराळ्या देशांतील मध्यवर्ती बँका स्थैर्याच्या दृष्टीने सोनेखरेदी करत आहेत. त्याचाही परिणाम भारतीयांच्या गुंतवणूक दृष्टिकोनावर होतो आहे. तूर्तास आजपासून व्हॅलेंटाइन वीक म्हणजेच प्रेमाचा आठवडा सुरू झाला असून या पार्श्वभूमीवरही सोन्याचांदीच्या दरात वाढ दिसून येत आहे. दहा ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर मुंबईत शुक्रवारी ८४,७८० रुपये दिसून आला तर दिल्लीत तो ८६,६९३ रुपये इतका होता. सोन्याच्या भावात सातत्याने वाढ होताना दिसत असूनही भारतीयांचे सोन्याविषयीचे आकर्षण कायम आहे. मागील संपूर्ण वर्षाचा आढावा घेतल्यास सोन्याच्या भावात अनेक पटींनी वाढ झाली आहे. या वर्षी १ जानेवारी रोजी दिल्लीमध्ये सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम ७९,३९० रुपये होता. या भावात साधारण महिनाभरात झालेली वाढ आपल्यासमोर आहे. सोन्याच्या मागणीत होत असलेली वाढ आणि जगभरातील भूराजकीय अशांतता यांचाही परस्पर संबंध गेली दोन वर्षे दिसत आला आहे असे तज्ज्ञ नमूद करतात. एका बाजूला सोन्याचे दर वाढत चालले आहेत, तर दुसऱ्या बाजूला डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत होत आहे. अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाने केलेल्या कडक उपाययोजनांमुळे जगभरातील आर्थिक अनिश्चिततेत भरच पडली आहे. जगभरात महागाई वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांनी त्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक पर्याय म्हणून मोर्चा वळवलेला दिसतो आहे. सध्याच्या वातावरणात शेअर बाजारात तोटा होऊ शकतो अशी भीती वाटत असल्यामुळेही गुंतवणूकदार सोन्याकडे वळत आहेत असे शेअर बाजाराचे विश्लेषक सांगतात. अवघ्या जगभरात असेच चित्र दिसते आहे.**

# शास्त्रीय गायक बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर



पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे ख्याल गायकीत पारंगत असे ग्वाल्हेर घराण्याच्या हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे गायक होते. महाराष्ट्रात ख्यालगायनाचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे मिरज, औंध आणि इचलकरंजी येथील राजदरबारात दरबारी राजगायक होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त लेख...

मिरजजवळील बेगड येथे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचा जन्म ७ सप्टेंबर १८४९ रोजी झाला. त्यांचे घराणे भिक्षुकांचे. त्यांचे वडील रामभट यांनी भिक्षुकी सोडून साताऱ्याचे बाळाजीबुवा यांच्याकडे गाण्याचे शिक्षण घेतले. आपल्या मुलानेही गाणे शिकावे अशी त्यांची फार इच्छा होती. वयाच्या पाचव्या वर्षी बाळकृष्णाला त्याची मातोश्री निधन पावल्याने, इचलकरंजी येथील त्याचे चुलते विष्णुभट यांच्याकडे भिक्षुकी शिकण्यासाठी पाठविण्यात आले. बाळकृष्णाला भिक्षुकीची गोडी नसल्यामुळे गायन शिकण्यासाठी तो वयाच्या दहाव्या वर्षी घर सोडून बाहेर पडला. पुढे वडीलही वारले. फिरत फिरत तो धार येथे देवजीबुवांकडे गाणे शिकण्यास राहिला. तीन वर्षे त्यांच्याकडे शिक्षण घेतल्यानंतर गुरुपत्नीच्या त्रासामुळे बाळकृष्ण धार सोडून गाणे शिकण्यासाठी ग्वाल्हेरला गेला. तेथील हस्सूखाँचे शिष्य वासुदेवराव जोशी यांच्याकडे तो गायन शिकण्यास गेला. प्रथम वासुदेवबुवांनी गाणे शिकवण्यास नकार दिला; पण पुढे एक वर्षाने बनारस येथे त्यांनी बाळकृष्णबुवांना शिकविण्याचे कबूल करून, पुढे सहा वर्षे चांगले शिक्षण दिले.

बाळकृष्णबुवा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात आले. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजीकर यांच्याकडे जवळजवळ ३० वर्षे दरबार–गवई म्हणून राहिले. पं. बाळकृष्णबुवा अत्यंत भरतीदार व यशस्वी गायक होते. त्यांची गायकी साधी, निर्मळ, भारदस्त व सौंदर्यपूर्ण होती. खास ग्वाल्हेर गायकीचा प्रचार महाराष्ट्रात बाळकृष्णबुवांनीच केला. मिरज आणि इचलकरंजी येथे त्यांच्याकडे पुष्कळ लोक शिकू लागले. बाळकृष्णबुवांच्या आधीही महाराष्ट्रात ख्याल गायकी रूढ होतीच; पण तिच्या विस्तृत प्रमाणावरील प्रसाराचे श्रेय बाळकृष्णबुवांनाच दिले जाते. त्यांच्या दोन शिष्य–शाखा सर्वश्रुत आहेत. पहिल्या शाखेत पं. विष्णू दिगंबर पलुस्कर व त्यांच्या गांधर्व महाविद्यालयातून शिकून तयार झालेले विनायकबुवा पटवर्धन, नारायणराव व शंकरराव व्यास, ओंकारनाथ ठाकूर, वामनराव पाध्ये, प्रा. बा. र. देवधर इत्यादी नामवंत गवयांचा समावेश होतो. १९२५मध्ये त्यांचे चिरंजीव तरुण, सिद्धहस्त गायक अण्णाबुवा मृत्यू पावले, या घटनेचा त्यांच्यावर जबरदस्त आघात होऊन पं. बाळकृष्णबुवा हे इचलकरंजी येथे मृत्यू पावले. संगीतातील 'भीष्माचार्य', 'गायनाचार्य' ह्या पदव्या रसिकांनी त्यांना स्वेच्छेने बहाल केल्या होत्या. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे ८ फेब्रुवारी १९२७ रोजी निधन झाले.

खास ग्वाल्हेर गायकीचा प्रचार महाराष्ट्रात बाळकृष्णबुवांनीच केला. मिरज आणि इचलकरंजी येथे त्यांचेकडे पुष्कळ लोक शिकू लागले. बाळकृष्णबुवांच्या आधीही महाराष्ट्रात ख्याल गायकी रूढ होतीच पण तिच्या विस्तृत प्रमाणावरील प्रसाराचे श्रेय बाळकृष्णबुवांनाच दिले जाते. त्यांच्या दोन शिष्य–शाखा सर्वश्रुत आहेत. पहिल्या शाखेत पं. विष्णू दिगंबर पलुस्कर व त्यांच्या गांधर्व महाविद्यालयातून शिकून तयार झालेले विनायकबुवा पटवर्धन, नारायणराव व शंकरराव व्यास, ओंकारनाथ ठाकूर, वामनराव पाध्ये, प्रा. बा. र. देवधर इ. नामवंत गवयांचा समावेश होतो तर दुसऱ्या शाखेत मिराशीबुवा, अनंत मनोहर जोशी, त्यांचे चिरंजीव गजाननराव, तसेच शिष्य बापूराव गोखले व त्यांचे शिष्य राजारामबुवा पराडकर इ. प्रसिद्ध गवयांचा अंतर्भाव होतो. १९२५ मध्ये त्यांचे चिरंजीव तरुण, सिद्धहस्त गायक अण्णाबुवा मृत्यू पावले, या घटनेचा त्यांच्यावर जबरदस्त आघात होऊन पं. बाळकृष्णबुवा हे इचलकरंजी येथे मृत्यू पावले. संगीतातील 'भीष्माचार्य', 'गायनाचार्य' ह्या पदव्या रसिकांनी त्यांना स्वेच्छेने बहाल केल्या होत्या.

**(साभार : इंटरनेट)**

# ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ झाकिर हुसेन



भारताचे तिसरे राष्ट्रपती, एक ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ आणि भारत सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या सर्वोच्च अशा भारतरत्न पुरस्काराचे मानकरी झाकिर हुसेन. त्यांचा जन्म ८ फेब्रुवारी १८९७ रोजी अफ्रिडी अफगाण मुसलमान कुटुंबात हैदराबाद (सिंध) येथे झाला. त्यांचे वडील वकील होते. झाकिर हुसेन नऊ वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारले. त्यामुळे झाकिर हुसेन यांना शिक्षणासाठी इटावा, अलीगढ आणि बर्लिन इत्यादी ठिकाणी फीरावे लागले. त्यांनी अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी मिळविली. ही पदवी मिळविण्यापूर्वी ते १९२० मध्ये जामिआ मिल्लिया इस्लामिया या शिक्षणसंस्थेकडे आकर्षित झाले होते.

जर्मनीहून भारतात परत येताच त्यांनी आपले सर्व जीवन या संस्थेस समर्पित केले. १९२५ मध्ये ही संस्था दिल्लीस हलविण्यात आली व झाकिर हुसेन १९२६ मध्ये तिचे कुलगुरू झाले. त्यांनी जवळजवळ बावीस वर्षे (१९२६–४८) या संस्थेचे कार्य केले व तिला एका अभिनव शिक्षणसंस्थेचे स्वरूप दिले.

झाकिर हुसेन यांची शैक्षणिक वाटचालीतील स्फूर्तिस्थाने दोन होती : महात्मा गांधी (चरहरींर ऋपवहळ) व जर्मन शिक्षणशास्त्रज्ञ केर्शेनस्टाइनर. विद्यापीठात बौद्धिक स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य पुरेपूर असावे आणि व्यासंगी विद्वानांचे ते सभास्थान व्हावे; कारण अशा वातावरणात विद्यार्थ्यांचे नीतिधैर्य विकास पावते, अशी त्यांची धारणा होती. त्यांनी स्वयंशिक्षणावर भर देऊन नव्या शैक्षणिक कल्पना जामिआ मिल्लियामध्ये रुजविल्या. ते अलीगढ मुस्लिम विद्यापीठाचे कुलगुरू झाले (१९४८–५६). १९५६ साली ते राज्यसभेवर निवडून आले. पुढे ते बिहारचे राज्यपाल झाले आणि नंतर उपराष्ट्रपती म्हणून निवडले गेले (१९६२). १९६७ मध्ये ते भारताचे राष्ट्रपती झाले.

झाकिर हुसेन यांनी अनेक शैक्षणिक समित्यांवर काम केले. त्यांपैकी यूनेस्को, विद्यापीठ अनुदान आयोग, मध्यवर्ती माध्यमिक मंडळ, विद्यापीठीय शैक्षणिक आयोग ह्या काही महत्त्वाच्या संस्था होत. त्यांना अनेक परदेशीय आणि भारतीय विद्यापीठांनी डी. लिट्. ही सन्माननीय पदवी देऊन गौरविले आहे. भारत सरकारने त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा यथोचित गौरव पद्मविभूषण (१९५४) हा पुरस्कार देऊन केला. महात्मा गांधींचे ते प्रथमपासून निष्ठावान अनुयायी होते. १९३७ मध्ये महात्मा गांधींनी त्यांना मूलोद्योग शिक्षण समितीचे अध्यक्ष केले. आयुष्यभर त्यांनी या शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला.

झाकिर हुसेन यांनी शिक्षण, अर्थशास्त्र वगैरे विषयांचे आपले विचार अनेक व्याख्यानांद्वारे मांडले. त्यांपैकी काही व्याख्याने द डायनॅमिक युनिव्हर्सिटी या पुस्तकाच्या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. जर्मन भाषेमध्ये त्यांनी म. गांधींचे चरित्र लिहिले, तसेच प्लेटोच्या रिपब्लिकचे उर्दूत भाषांतर केले. लहान मुलांकरिता काही गोष्टीही त्यांनी लिहिल्या आहेत. स्फटिकांचा आणि चित्रविचित्र खड्यांचा संग्रह करणे, हा झाकिर हुसेन यांचा आवडता छंद होता. ते ग्रंथप्रेमी होते व त्यांचे ग्रंथालय नव्यानव्या ग्रंथांनी नेहमी भरलेले असे. एक नेमस्त, चारित्र्यवान व शिक्षणतज्ज्ञ असा राष्ट्रीय मुस्लिम नेता म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. झाकिर हुसेन राष्ट्रपती असतानाच नवी दिल्ली येथे ३ मे १९६९ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल क्रोमवरील पासवर्ड असा करा डिलीट व मॅनेज

जर तुम्ही गुगल क्रोम वापरत असाल तर त्यातील पासवर्ड मॅनेजर फीचरचा वापर करणेही तुम्हाला जमलं पाहिजे. यामुळे पासवर्ड विसरण्याची भीती राहत नाही.



गुगल क्रोम जगातील सर्वात लोकप्रिय इंटरनेट ब्राउजर्स पैकी एक आहे आणि याचा वापर कोट्यवधी लोक करतात. यात ब्राउजरमध्ये खास Password Autofill फीचर मिळतं, ज्यामुळे तुमचे पासवर्ड सेव्ह करता येतात आणि वारंवार पासवर्ड एंटर करण्याची झंझट राहत नाही, परंतु बऱ्याचदा चुकून नको असलेले पासवर्ड सेव्ह होतात किंवा दुसऱ्यांच्या डिव्हाइसवर तुम्ही लॉगिन करत असाल तर तिथे पासवर्ड सेव्ह होतो. किंवा ऑटो सेव्ह पासवर्ड ऑन असेल तर सर्वच पासवर्ड सेव्ह होतात. अशावेळी तुम्ही हवं तेव्हा कोणताही सेव्ह पासवर्ड अपडेट किंवा डिलीट करू शकता. क्रोममध्ये पासवर्ड्स सेव्ह केल्यावर युजर्सना कोणत्याही प्रकारचा डेटा लीक झाल्यावर पासवर्ड बदलण्याची चेतावणी दिली जाते. तसेच एखादा पासवर्ड कमजोर असल्यास देखील युजर्सना पासवर्ड बदलण्यास सांगितले जाते.

**या स्टेप्स फॉलो करून पाहा सेव्ह केलेला पासवर्ड**

सर्वप्रथम तुमच्या फोन किंवा लॅपटॉपमध्ये Chrome ब्राउजर ओपन करा. त्यानंतर टॉप राइट कॉर्नरवर दिसणाऱ्या तीन डॉट्सवर टॅप किंवा क्लिक करा. पुढे ड्रॉप–डाउन मेन्यू मधून Settingsमध्ये जा. इथे तुम्हाला एक Passwords सेक्शन मिळेल, त्यावर टॅप करून तुम्ही सेव्ह केलेले पासवर्ड्स पाहू शकता. लक्षात घ्या इथे तेच पासवर्ड दिसतील जे तुम्ही स्वतःहून सेव्ह केले असतील किंवा चुकून सेव्ह झाले असतील. तसेच जर तुम्ही ऑटो सेव्ह ऑप्शन ऑन केला असेल तर सर्वच पासवर्ड सेव्ह झालेले असतील.

**अशा प्रकारे मॅनेज करा पासवर्ड्स**

पासवर्ड मॅनेजरमध्ये तुमचे पासवर्ड्स ऑटोसेवचा ऑप्शन ऑफ किंवा ऑन करणायचा पर्याय देखील मिळेल. तसेच इथून तुम्ही ऑटो साइन–इन देखील ऑफ करू शकता. तुम्हाला एखाद्या वेबसाइटचा पासवर्ड क्रोममधून डिलीट करण्याचा देखील ऑप्शन इथेच मिळेल. लक्षात असू द्या पासवर्ड्स पाहण्यापूर्वी तुम्हाला गुगल अकाऊंटचा पासवर्ड टाकावा लागू शकतो, किंवा तुमच्या डिव्हाइसचा पासवर्ड देखील विचारला जाऊ शकतो. इतर कोणीही पासवर्ड ॲक्सेस करू नये म्हणून ही सोय करण्यात आलेली आहे.

# ज्येष्ठ समाजसेविका डॉ. इंदूताई पटवर्धन



## निमित्त

समाजाने दूर अंधःकारात लोटलेल्या कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ समाजसेविका, राजकुमारी डॉ. इंदुताई पटवर्धन यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म जमखिंडीच्या राजघराण्यात १४ मे १९२६ रोजी झाला.

इंदुताईंचे शिक्षण जमखिंडी व कोल्हापूर येथे झाले. राजकुमारी म्हणून जन्मलेल्या इंदूताईंनी १६व्या वर्षी गांधीजींच्या चळवळीस वाहून घेतले. माँटेसरी शिक्षणक्रम पूर्ण करून त्या सेंट कोलंबो स्कूलमध्ये शिक्षिका बनल्या. पुढे ब्रिटिश इंडियन रेड क्रॉस आणि सेंट जॉन ॲम्ब्युलन्सच्या कामामध्ये दाखल झाल्या. दुसऱ्या महायुद्धातल्या प्रत्यक्ष युद्धभूमीवर जखमी लष्करी जवानांचे शुश्रुषेसाठी ब्रह्मदेश, जावा येथे गेल्या. सिंगापूर, जपान, येथेही त्यांनी काम केले. वर्ष १९५३ मध्ये सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी होमिओपॅथीचे शिक्षण घेतले. खेड शिवापूर येथे दवाखाना सुरू केला. पूना विमेन्स काउंसिलचे कामही त्या करीत होत्या. पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशनच्या त्या संस्थापक सदस्या होत्या. लष्करातील जवान व आदिवासी समाजातील आजारी, जखमी रुग्णांची सेवा करत त्यांनी आपले आयुष्य अर्पण केले. त्यासाठी त्या जन्मभर अविवाहित राहिल्या.


मुंबई इलाख्यात आपले जमखंडी संस्थान विलीन करणारे त्यांचे भाऊ राजा परशुराम शंकरराव पटवर्धन हे भारतीय राजघराण्यांपैकी पहिले संस्थानिक होते. पुणे येथील पूना कॉलेजला सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपये इतकी देणगी त्यांनी दिली होती व तेव्हापासून ते कॉलेज सर परशुरामभाऊ कॉलेज (एस. पी. कॉलेज) म्हणून ओळखले जाऊ लागले.

ऑक्सफॉम या संस्थेकडून १९६१ साली मिळालेल्या १७ हजार रुपयांच्या मदतीवर पुण्याजवळच्या डुडळगाव येथील एका ओसाड जागेवर आनंदग्राम' नावाने कुष्ठरोग्यांची वसाहत उभी केली. पश्चिम महाराष्ट्रात पुण्याजवळ कुष्ठरोग सेवाकेंद्र सुरू करणाऱ्या त्या पहिल्या महिला कार्यकर्त्या आहेत. वर्ष १९६५मध्ये महाराष्ट्र शासनाचा भिक्षा प्रतिबंध कायदा अमलात आल्यावर त्यांनी ८० रुग्णांसह कुष्ठरोग्यांसाठी प्रत्यक्षात वर्ष १९६५मध्ये काम सुरू केले. आळंदी जवळच्या सध्याच्या आनंदग्राम' येथे वर्ष १९७० मध्ये त्यांनी स्थलांतर केले.

उला लेडी हाइड पार्कर, राधा रमणजी अशा व्यक्तींच्या सहाय्यामुळे आनंदग्राम'ला सध्याचे विशाल स्वरूप आल्याचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात. सध्या आश्रमात राहणाऱ्यांकडून येथे शेती, कुक्कुटपालन, गोपालन, कापड उद्योग आदी अनेक उपक्रम यशस्वीपणे चालविले जातात. रेशमासाठी तुती इत्यादीची लागवड केली जाते. मुला–मुलींनी फुलून आलेल्या शाळा, शेतीला नियोजन करून दिलेले पाणी, सदैव कार्यरत असलेले हात, हे आनंदग्रामचे आजचे आदर्शवत ठिकाण झाले आहे. खाद्यतेल सोडले तर सर्व काही इथेच बनते, धान्य पिकते, हातमागावर कपडे तयार होतात, दवाखाना, केशकर्तनालय इथे आहे. गोबर गॅस बनतो. इतके स्वयंपूर्ण गाव येथे त्यांनी उभे केले.

इंदुताई पटवर्धन यांच्या कार्याची दाखल घेऊन शासनाने त्यांना दलितमित्र हा पुरस्कार दिला. ८ फेब्रुवारी १९९९ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# वाढत्या वयात मुलांना द्या 'हे' पदार्थ; अनेक फायदे

सर्वसाधारणपणे १४ ते १८ वर्षे वयोगटातील मुले ही किशोरवयीन असतात. आणि याच काळात त्यांच्यात फक्त शारीरिक नव्हे तर मानसिकी आणि भावनिक बदलही होत असतात. त्यामुळे या काळात मुलांच्या मानसिक आरोग्याची आणि शारीरिक वाढीची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. सध्याच्या खराब आणि ढासळत्या जीवनशैलीत पालकांना अनेकदा त्यांच्या मुलांच्या विकासाबद्दल चिंता वाटत असते. किशोरवयीन मुलांमध्ये खाण्याच्या सवयीपासून ते व्यायामापर्यंत आरोग्यदायी सवयी लावणे खूप महत्त्वाचे आहे.



देशी तूप, दूध, दही आणि लोणी यासारख्या दुग्धजन्य पदार्थांचा मुलांच्या आहारात समावेश करणे आवश्यक आहे. किशोरवय हा शारीरिक वाढीचा काळ असतो. आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी आढळतात ज्यामुळे दात आणि हाडे मजबूत होतात. त्यामुळे मुलांची उंचीही वाढण्यास मदत होते.

**प्रोटीनयुक्त पदार्थही गरजेचे**

पौगंडावस्थेत स्नायूंना बळकट करण्यासाठी की अंडी, बीन्स, टोफू, चिकन, सोयाबीन, कडधान्ये, सुका मेवा इत्यादी प्रथिनयुक्त पदार्थांचा मुलांच्या आहारात समावेश करावा. यामुळे मेटाबॉलिज्मटा रेट वाढतो. तसेच प्रथिनेयुक्त आहारामुळे मेंदूचा विकास होण्यास मदत होते. यामुळे शारीरिक व मानसिक बदल होत असताना मूल शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या मजबूत राहू शकते.

**व्हिटॅमिन आणि मिनरलयुक्त पदार्थ**

किशोरवयीन मुलांनी संतुलित आहार घेणे खूप महत्वाचे आहे. जीवनसत्त्वे असलेल्या पदार्थांच्या सेवनामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. आणि वाढत्या वयात मुलांचे रोगांपासून संरक्षण होते, ज्यामुळे त्यांची वाढ चांगली राहते. या वयात मायक्रो कंपाऊंड झिंक व्यतिरिक्त शरीराला मॅग्नेशिअम, आयोडीन, लोह आणि कॅल्शिअमचीही गरज असते. हे सर्व पोषक घटक आहारातून मिळू शकतात. यासाठी आहारात भरपूर फळे, बिया आणि हिरव्या भाज्यांचा समावेश करा.

**कार्बोहायड्रेट्समुळे मिळते एनर्जी**

वाढत्या वयातील मुलांच्या आहारात कार्बोहायड्रेट्सयुक्त पदार्थांचा भरपूर समावेश करावा. यासाठी आहारात बाजरी, ज्वारी, नाचणी यासारख्या संपूर्ण धान्याचा समावेश करावा. तसेच बटाटा, रताळं यासारख्या स्टार्चयुक्त पदार्थांचाही आहारात समावेश असावा.

# खालापूर तालुक्यातील तरुणांचा भाजपत प्रवेश

## मान्यवर नेतेमंडळींकडून खारघर येथील कार्यक्रमात स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील अनेक तरुणांनी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन खालापूर पूर्व मंडळ अध्यक्ष सनी यादव यांच्या नेतृत्वाखाली खारघर येथे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.



ग्रामपंचायत देवन्हावे येथील दहिवली गावातील रोणीत म्हात्रे, अजय खताळे, राहुल पाटील, तुषार जाधव, जय भिल्लारे, साहिल केदारी, आत्करगाव येथील महेश निरगूळकर, दीपक मांगुळकर, राहुल शिंदे, कल्पेश साळवी अंजरून गावातील नितेश वाघमारे, केतन वाघमारे, सचिन वाघमारे, अक्षय वाघमारे, समीर पवार आदी कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

केंद्रात नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यात देवेंद्र फडणवीस सरकार असल्याने अनेक तरुण कार्यकर्ते भाजपकडे प्रभावित होत असून लवकर अनेकजण भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत, असे भाजप खालापूर पुर्व मंडळ अध्यक्ष सनी यादव यांनी सांगितले.

या वेळी तालुका युवा मोर्चा अध्यक्ष नागेश पाटील, विकास रसाळ तालुका चिटणीस, अभि कदम, भरत महाडिक आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# माथेरानची व्हीआयपी पार्किंग खासगी वाहनांसाठी बंद



**माथेरान : बातमीदार**

माथेरान या पर्यटनस्थळाची सर्व जमीन वन विभागाची असल्याने अर्थातच सर्व जमिनीवर वन विभागाचे नियंत्रण आहे. त्या शहरातील वाहनतळ असलेल्या दस्तुरी नाका येथील वन विभागाची व्हीआयपी पार्किंग आता केवळ सरकारी अधिकाऱ्यांची असणार आहे. तसे फलक लावले गेले आहेत. या पार्किंगमध्ये कायम उभ्या असलेल्या राजकारणी लोकांच्या गाड्यांवर यामुळे आता बंधने आली आहेत.

माथेरान शहरात दस्तुरी येथे सर्व वाहने थांबवली जातात.दस्तुरी वाहनतळ येथे असलेल्या पार्किंगमध्ये पर्यटकांची तसेच स्थानिकांची वाहने पार्किंग करण्याची सुविधा आहे. माथेरान येथे प्रामुख्याने हायकोर्टाचे न्यायाधीश यांची सातत्याने वर्दळ असते. त्यामुळे येथील वन जमिनीवर व्हीआयपी पार्किंग बनवली होती. त्या ठिकाणी सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहनांना पार्किंगची व्यवस्था केली जात होती. मात्र मागील काही वर्षात माथेरानमधील राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची वाहने त्या व्हीआयपी पार्किंगमध्ये उभी राहू लागली आहेत.

यामुळे सरकारी अधिकाऱ्यांच्या गाड्या लावायच्या कुठे, असा प्रश्न निर्माण होऊ लागला. व्हीआयपी पार्किंगमध्ये उभ्या राहणाऱ्या वाहनांची संख्या जेमतेम चार एवढी आहे आणि माथेरान शहरातील व्हीआयपी यांची संख्या ५० बनल्याने वन विभागाच्या व्हीआयपी पार्किंगमधील वाहने उभी करण्यावरून वाद निर्माण होऊ लागले. त्यातच माथेरान येथे सरकारी अधिकारी असलेले वनविभाग आणि पोलीस दल यांना सरकारी वाहने आहेत. अन्य विभागांचे अधिकारी असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांना शासनाची वाहने नाहीत. मात्र बहुसंख्य अधिकाऱ्यांकडे स्वतःच्या गाड्या असल्याने त्या गाड्यांना व्हीआयपी पार्किंग मिळावी, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.हे लक्षात घेऊन व्हीआयपी पार्किंग नक्की कोणासाठी असे वाद पुढे येऊ लागले.

यामुळे वन क्षेत्रपाल कार्यालयाने माथेरान दस्तुरी येथील वन विभागाच्या व्हीआयपी पार्किंगबाबत निर्णय घेतला आणि तेथील पार्किंग केवळ सरकारी वाहनांसाठी असल्याचे फलक लावले. त्याचवेळी सरकारी वाहनांशिवाय अन्य वाहने यांना तेथे पार्किंग करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्याबाबत त्या सूचना फलकावर वनविभागाच्या व्हीआयपी पार्किंगमधील वाहनतळाबाबत कोणीही तो प्रश्न प्रतिष्ठेचा करू नये असे सूचित केले आहे. त्यावेळी सरकारी वाहने आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्यासाठी तसेच आमदार, खासदार, मंत्री यांच्या व्हीआयपी वाहनांना तेथील पार्किंग असणार आहे. त्याचा परिणाम आता व्हीआयपी पार्किंगमध्ये कोणीही खासगी वाहने पार्क केलेली दिसून येत आहे.

वन विभागाच्या या निर्णयामुळे राजकारणी मंडळींमध्ये काहीशी नाराजी व्यक्त होत आहे. मात्र, अनेकांनी वनविभागाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. मात्र त्याचवेळी माथेरान शहरातील व्हीआयपी असलेले माथेरान पालिकेचे माजी पदाधिकारी यांच्यासाठी वाहनतळ येथे एक जागा वन विभागाने निश्चित करून द्यावी जेणेकरून पर्यटन हंगाम असेल त्यावेळी देखील आपल्या गाड्या पार्क करून ठेवण्याची हक्काची जागा असेल असे मतप्रवाह सुरू आहेत.

# जोसरांजण येथे आमदार निधीतून समाजमंदिर भूमिपूजन

**मुरुड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरुड रोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या आमदार निधीतून १० लाख रुपये मंजूर करण्यात येऊन जोसरांजण गावातील समाज मंदीरचे भुमीपुजन माजी सरपंच व शिवसेनेचे नेते विलास सुर्वे (भाई) यांच्या शुभहस्ते करण्यात आले .यावेळी सदरील कार्यक्रमासाठी शिवसेनेचे अलिबाग युवा संघटक विघ्नेश माळी, उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, तालुकाप्रमुख ऋषिकात डोंगरीकर, ,उपतालुका प्रमुख मनोज कमाने रायगड जिल्हा संघटक दिनेश मिनमिने, माजी सभापती किशोर धामणस्कर, तालुका महीला सघटीका मंदाताई ठाकूर ,संतोष पाटील, जनार्दन मादाडकर, अमित गायकर, नथुराम गुड, अशोक पाटील ,सुनिल मादाडकर आदी सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी विलास सुर्वे यांनी सांगितले की,आमदार दळवी असल्याने विकास कामांसाठी कधी ही निधी कमी पडणार नाही. शिवसेनेचे युवा संघटक विघ्नेश माळी यांनी सांगितले निवडणुकी पूर्वी आम्ही जी आश्वासने दिली होती. ती कामे पूर्ण करताना आम्हाला आनंद होत आहे.मुरुड तालुक्यात विकास कामांचा झंझावत पुढील काळात ही पहावयास मिळेल. उप जिल्हा प्रमुख भरत बेलोसे यांनी आमदारांच्या काळात सर्वाधिक विकास कामे मुरुड तालुक्यात झाल्याने येथील जनता समाधानी असल्याने नमूद केले.तर शिवसेनेचे जिल्हा संघटक दिनेश मिनमिने यांनी कार्य सम्राट आमदार असल्यानेच अलिबाग मुरुड मतदार संघाचा वेगाने विकास होत आहे.

आमदारांची जनतेशी बांधिलकी असल्याने जनतेचे हित आमदार दळवी यांनी नेहमीच जपले असल्याचे सांगितले.सदरील कार्यक्रमात लोकांनी मोठी गर्दी केली होती.

## योगासन स्पर्धेत ओंकार उतेकर यांना रौप्यपदक

**पोलादपूर : प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यातील टाकरखेडा मोरे येथील मानवसेवा विकास फाउंडेशन आयोजित पाचव्या राष्ट्रीय योग व निसर्गोपचार संमेलन अंतर्गत प्रथम राज्यस्तरीय खुली योगासन स्पर्धा ३ फेब्रुवारी रोजी संत गुलाबबाबा आश्रम येथे पार पडली. यामध्ये रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील रानवडी येथील ओंकार उतेकर यांनी रौप्यपदक प्राप्त केले.

या स्पर्धेत अमरावतीतील रणजित देशमुख यांना सुवर्ण, तर पुण्यातील शिरूर येथील योगेश भालेराव यांना कांस्यपदक प्राप्त केले.



# संभाजी भिडे यांचे पोलादपूरमध्ये स्वागत



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे संभाजी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली उमरठ येथून शनिवारी सकाळी सुरू होणाऱ्या धारातीर्थ गडकोट मोहिमेसाठी श्री दुपारी साडेचार वाजता पोलादपूर तालुक्यात पोलादपूर तालुक्यात भिडे गुरुजी यांचे आगमन झाल्यानंतर ठिकठिकाणी त्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. शनिवारी सकाळी धारातीर्थ गडकोट मोहीम सुरू होणार आहे.

पितळवाडी येथे शिवप्रेमी ग्रामस्थ तसेच महिला त्यांच्या उपस्थितीमध्ये आणि धारकरी मावळ्यांच्या शिस्तबद्ध नियोजनात भिडे गुरुजी उमरठ येथे रवाना झाले. पितळवाडी येथे ढवळी कामथी सावित्री चालक-मालक वाहतूकदार संघटनेकडून भिडे गुरुजी यांचे धुमधडाक्यात स्वागत करण्यात आले. वाहतूकदार संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ कुंभार, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान प्रतिष्ठान पोलादपूर तालुका अध्यक्ष दीपक उतेकर, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभागप्रमुख संजय मोदी, उबाठा सेना तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, उपसभापती सुमन खेडेकर, सुमन केसरकर, सुमन कुंभार, अर्चना कुंभार, आदी उपस्थित होते.

शुक्रवारी सायंकाळी उशिरा रायगड जिल्हा अतिरिक्त पोलिस अधीक्षक आणि मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत संभाजी भिडे यांची भेट घेऊन पुढील नियोजन व कार्यक्रमाच्या रुपरेषेबाबत चर्चा करण्यात आली. शनिवारी सकाळी धारकरी नरवीर तानाजी मालुसरे समाधीस्थळी अभिवादन करून उमरठ येथून साखर येथे नरवीर सुर्याजी मालुसरे समाधीस्थळी तसेच कारगिल शहिद तानाजी बांदल यांच्या समाधीस्थळी धारकरी मंडळींना पुढील मार्गक्रमण करण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल.

## पालिका प्रशासकांनी केला सहकाऱ्याचा वाढदिवस साजरा

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगरपालिका मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांनी आपल्या महिला सहकारी करुणा बांगर यांचा वाढदिवस नगरपालिका कार्यालय मध्ये सर्व सहकारी कर्मचाऱ्यांसह सायंकाळी पालिका सुट्टी नंतर मोठ्या उत्साहात साजरा केला.

माथेरान नगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या करुणा बांगर या मागील वर्षभरापासून कार्यरत आहेत.येथील कार्यक्षम अधिकारी म्हणून त्यांनी आपली ओळख आहे.


वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर



### पनवेल महानगरपालिका

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती 'ड' पनवेल महानगरपालिका. | ०१ पिंपळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कर्नाळा सर्कल ते टपाल नाका पर्यंत रस्त्याचे रूंदीकरण करणेस बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०२/२०२५

सही/-
उपायुक्त
(वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका



**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**

Veer Wajekar ASC College, Mahalan Vibhag, Phunde, Uran

**- TENDER NOTICE -**

Tenders are invited from reputed firms/companies for various internal and external work of college..

The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available in the college. For further process visit college office from 08.2.2025 to 14.02.2025 from 10:00 am to 5:00 pm

For more details contact to I/C Prin. Dr. A.N.Thakkar (9322891200)

Details are as follows –

| Work | Aprox. Cost of Project | Earnest Money Deposit (1%) | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|
| Open Gym | 2,73,600/- | 2736/- | Rs.500/- |
| Solar Hut (2) | 7,00,000/- | 7000/- | Rs.1000/- |
| Canteen Shed + Container Cabin | 5,00,000/- | 5000/- | Rs.1000/- |
| Coloring | 5,54,000/- | 5540/- | Rs.1000/- |
| Car Parking Solar | 7,50,000/- | 7500/- | Rs.1000/- |

sd/-
I/C Principal
Veer Wajekar ASC College, Phunde



### पेण नगरपरिषद, पेण

**जाहीर निविदा**

पेण नगरपरिषदेतर्फे १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करावयाची आहे. त्या अनुषंगाने खालील नुसार निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१. पेण नगरपरिषद छत्रपती शिवाजी महाराज मेघडंबरी चे सुशोभिकरण करणे. (झालर व पडदे लावण्यात यावे.)
२. विद्युत रोषणाई करणे
३. स्पिकर सेट बसविणे

सदरची निविदा दोन बंद लिफाफ्यात देण्यात यावी. याकामी **५०रु फॉर्म फि** असुन फॉर्म फि सोबत **५०० रु इसारा रक्कम** भरण्यात यावी. निविदा चा कालावधी **०८/०२/२०२५ ते १४/०२/२०२५** हा आहे. यानुसार निविदा सादर करण्यात यावी. निविदेची फॉर्म फि दिनांक **१३/०२/२०२५** रोजीपर्यंत सामान्य प्रशासन विभागाकडे उपलब्ध राहील. निविदा भरण्याची अंतिम तारीख **१४/०२/२०२५** या तारखेपर्यंत वेळ ४.०० वाजेपर्यंत राहील. निविदेच्या अटी व शर्ती या निविदा फॉर्म वर नमुद आहेत.

**जा.क्र.पेनप/का-१/ सा.प्र./२०२५/३४५२**

सही/-
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद,पेण



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे वांगणी तर्फे वाजे, ता.पनवेल, जि. रायगड येथील **हरेश्वर रामचंद्र भगत** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काने पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे वांगणी तर्फे वाजे, तालुका, पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| हरेश्वर रामचंद्र भगत | १७ | | १-६६-२० एकुण क्षेत्रापैकी फेरफार क्र.१३१२ प्रमाणे खरेदी क्षेत्र ०-२०-० हे.आर.चौ.मी. | २.७१ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यू. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०२/२०२५

सही/-
अॅड. विजय भगत अॅन्ड असोशिएटस्
(अॅडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email : vijaybhagat43@gmail.com



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आंबिवली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे आंबिवली बुदूक, ता. कर्जत, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| आंबिवली बुद्रूक | अब्दुल वहिद अब्दुल अजीज खान | ७५ | ०-१७-१२ |

सदर जमीन मिळकतीपैकी अब्दुल वहिद अब्दुल अजीज खान यांच्या मालकीच्या सदर जमिनीमधील दि. ०५/०२/२०२५ रोजी हद्दी निश्चित केलेल्या ०-०७-० गुंठे जमिनीसंबंधी.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

ता. ७-२-२०२४
पनवेल

सही/-
अॅड. वाय.एस.भोपी
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स
शिवाजी पुतळ्यापूढे पनवेल
मोबाईल नं. ९८२०२७३६९१

# ‘रोटरी’च्या माध्यमातून पनवेल उपजिल्हा रुग्णालयाला औषधे व वैद्यकीय उपकरणे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात औषधांचा तूटवडा भासत असताना रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत विस्टा प्रोसेसेड फूड्स च्या सी एस आर अनुदान फंडा द्वारे हॉस्पिटल मध्ये तब्बल दहा लाख रुपये किमतीची औषधे व वैदयकीय उपकरणे तातडीने हस्तांतरित करण्यात आली.



डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा हॉस्पिटल चे प्रमुख डॉ. गीते यांनी सर्वांचे स्वागत करून प्रस्तावना करताना या हॉस्पिटलचा फायदा पनवेल शहर तसेच तालुक्यातील लाखो रुग्ण घेत असल्याचे सांगितले. शिवसेनेचे महानगरप्रमुख ऍड. प्रथमेश सोमण यांनीही दिली. विस्टा प्रोसेस फुड कंपनीच्या माध्यमातून यापूर्वीही २०१९ व २०२३ रोजी तब्बल २० लाख रुपयांची औषधं व उपकरण उपजिल्हा रुग्णालयास तर मागील पाच वर्षात २५ लाख रुपयांची मदत दयालिसिस रुग्णांसाठी पटवर्धन रुग्णालयाला ही देण्यात आली होती.

रोटरी प्रांत चे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे यांनी मार्गदर्शन करताना रोटरी च्या माध्यमातून या उप जिल्हा हॉस्पिटल ला विविध वैद्यकीय उपकरणे वेळोवेळी उपलब्ध करून दिली असल्याचे सांगितले. पनवेल शहर पोलिस स्टेशन चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक ठाकरे यांनी रोटरी क्लब, उप जिल्हा रुग्णालय व विस्टा प्रोसेसेड फूड्स व सोमण कुटुंबीय यांच्या समर्पित रुग्णसेवेचे व कार्याचे कौतुक करून त्यांचे वेळोवेळी सहकार्य पोलिसांनाही मिळत असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमासाठी विस्टा प्रोसेसेड फूड्सचे व्यवस्थापकीय संचालक भुपिंदर सिंग, व्यवस्थापकीय सल्लागार तथा शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण, शिवसेना उपमहानगर प्रमुख महेश सावंत, पोलिस निरीक्षक अभंग, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, खजिनदार ऋषिकेश बुवा, प्रसाद सोनावणे, माजी अध्यक्ष डॉ. आमोद दिवेकर, रोटरी सदस्य, अँनस् व हॉस्पिटलचे सहकारी डॉक्टर्स, नर्सेस, फार्मासिस्ट, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि.६) व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग व जेके कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स घणसोली या दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.



या सामंजस्य करारासाठी व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागातील प्रा. रेवण शिंदे व प्रा.शिवानी मानकामे यांनी जेके कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात उपस्थिती दर्शवली. या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ श्रद्धा भोमे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून दोन्ही संस्थांमधे ज्ञान-संसाधनाची देवाण-घेवाण होईल अशी हमी दिली. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय उपक्रम तसेच वेगवेगळ्या विषयांचे कोर्सेस सुरू करण्यात येतील तसेच प्रशिक्षण देण्यात येईल.

सामंजस्य करार महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे, व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. रीत थुले यांच्या मार्गदर्शनात व सहमतीने करण्यात आला तसेच व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागाचे विभागातील इतर सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य केले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात नवीन कायद्यांबाबत जनजागृती कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय महालण विभाग, फुंडे (उरण) येथे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, न्हावा शेव पोलीस ठाणे व अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती, वीर वाजेकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने नवीन बदललेल्या कायदेविषयक शिबीर व सायबर गुन्हे जनजागृती कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

या कार्यशाळेत न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा.श्री.बी.टी.ओवे तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या अभियोक्ता मा.प्राजक्ता देशमुख साधन व्यक्ती व्यक्ती म्हणून लाभले होती. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी-प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते.



न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक .बी.टी.ओवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सायबर गुन्ह्याचे स्वरूप,सायबर गुन्हेगार वापरत असणारी तंत्रे आणि त्यापासून सावधगिरी बाळगण्यासाठी नागरिकांनी काय केले पाहिजे,याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन युवक-युवतींनी विविध समाजमाध्यमे हाताळत असतांना, विशेष खबरदारी घ्यावी.खोटे ओळख खाते डिजिटल अरेस्ट करण्याचे प्रकार, डीप फेक, व्हिडीओ मोर्फिंग, ऑनलाईन गेमिंग, सट्टा, धमकीचे फोन, ड्रीम इलेवन, ड्रीम सर्कल, जंगली रमी यासारख्या फसव्या खेळांपासून सावध रहावे.

उच्च न्यायालयाच्या अभियोक्ता श्रीमती. प्राजक्ता देशमुख यांनी सी.पी.सी. आणि सी.आर.पी.सी. यामधील विविध कायद्यांचा परामर्श घेतांना काळानुरूप या कायद्यांमध्ये कसे-कसे बद्दल होत गेलेले आहेत,याचे अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले.बाल गुन्हेगारांसाठीचे कायदे, तृतीय पंथीय व्यक्तींसाठी कायद्यात झालेले बद्दल स्त्री अत्याचार विरोधी कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी आर्थिक फसवणुकीचे आधुनिक प्रकार व त्याविषयक कायदे आणि विशेषतः स्त्री-पुरुष नात्यातील ताण-तणावांवर आणि शारीरिक संबंधांवर नवीन बदलणारे कायदे काय सांगत आहेत,याविषयी महाविद्यालयीन मुला-मुलीनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्रभारी -प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांनी सर्व नागरिकांनी आपले हक्क आणि कर्तव्य यांच्या जोडीला कायद्याच्या दृष्टीने पुरेसे साक्षर असणे गरजेचे असल्याचे सांगितले. महाविद्यालयात शिकत असतांना शिस्तीचे उल्लंघन होणार नाही, तसेच मला मुलींनी आपसात वागताना बोलतांना आपल्या विषयी तक्रार येणार नाही,असे वर्तन आपण कायम ठेवले पाहिजे, आपल्या आचार-विचारात नितीमत्ता, प्रामाणिकपणा ठेऊन आपल्याकडून कायदेबाह्य वर्तन होणारच नाही अशी काळजी घेण्याचे आव्हान केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा.गजानन चव्हाण यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.पंकज भोये यांनी केले. तर सूत्र संचालन प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले.या कार्यशाळेला प्रा.संतोष देसाई यांच्यासह सुमारे १२५ विद्यार्थी उपस्थित होते.



**खारघर : येथे झालेल्या इजतेमा कार्यक्रमातील काही जणांकडून उत्सव चौकातून वाशी येथे घरी जात असलेल्या शिवकुमार शर्मा यांची डोक्यात हेल्मेटने मारून हत्या करण्यात आली होती. या आरोपींना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या शिष्टमंडळाने खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दीपक सुर्वे यांची भेट घेत त्यांना निवेदन दिले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, विश्व हिंदू परिषदेचे प्रमोद प्रसन्ना, जागृत फाउंडेशनचे खरपुरिया, हिंदू जागरण मंचचे शिवमसिंग, ललित चौधरी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, अमर उपाध्याय, बिना गोगरी, श्यामला शेट्टीगर, संतोष शर्मा, सुमित सहाय, संध्या शारबिन्द्रे, झुमा चक्रवर्ती, गायत्री खडवडकर, मनोहर नक्का, संतोष नायर आदी उपस्थित होते.**

# मेरीडेल प्री-प्रायमरी स्कूलचा वार्षिक उत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

मेरीडेल प्री-प्रायमरी स्कूलने २३ वा वार्षिक सिल्व्हर सोइरी, युफोरिया, मोठ्या उत्साहाने आयोजित केला. विष्णूदास भावे नटगृह येथे झालेल्या या कार्यक्रमात प्रतिभा आणि उत्सवाचे विलक्षण प्रदर्शन पाहायला मिळाले. मेरिडेल प्री-प्रायमरी स्कूलच्या समन्वयक शीबा सोलोमन यांनी स्वागत भाषण केले.

आनंद, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक वारसा या विषयांवर प्रकाश टाकणाऱ्या पूर्व-प्राथमिक विद्यार्थ्यांच्या मनमोहक कामगिरीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. प्रमुख पाहुणे हिज ग्रेस डॉ. गीवर्गीज मार थिओफिलोस यांनी प्रेरणादायी शब्दांत उपस्थितांना संबोधित केले. मेरीडेल प्री-प्रायमरी स्कूल युफोरियाला भव्य यश मिळवून दिल्याबद्दल पालक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# पिल्लेज कॉलेजमध्ये एलेग्रिया महोत्सव

## अभिनेत्री सोनाली कुलकर्णीची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल शहरातील पिल्लेज महाविद्यालयामध्ये एलेग्रीया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने प्रमुख उपस्थिती दर्शवली. यावेळी तिने महाविद्यालयाचे विशेष कौतुक केले.



पिल्लेज महाविद्यालयामध्ये दरवर्षी एलेग्रीया महोत्सवाचे आयोजन शानदार पद्धतीने केले जाते. यावर्षी देखील मोठ्या दिमाखात एलेग्रियाचे आयोजन करण्यात आले आहे. मोठमोठ्या सेलिब्रिटी यावेळी येणार आहेत. पाच फेब्रुवारी रोजी या महोत्सवाला अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांनी आपली कला- कौशल्य दाखवत अप्रतिम नृत्य सादर केले. जजेस म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी या मुलांनी सादर केलेल्या नृत्याचे कौतुक केले.

या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सोनाली कुलकर्णी हिने अप्सरा आली या गाण्यावर नृत्य देखील केले. यावर्षीचा देखील अलेग्रिया महोत्सव सर्वोत्कृष्ट होईल असे पिल्लई महाविद्यालयाच्या पीआर डॉक्टर निवेदिता श्रेयांश यांनी सांगितले.

# कामोठे येथे श्रीमद्भागवत कथेमध्ये ईट प्ले रीडचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथे श्रीमद्भाभागवत कथा सुरू आहे. यामध्ये इट प्ले रीडने सहभाग घेतला. भारताची ओळख ऋषि आणि कृषि प्रधान देश म्हणून मोठ्या स्तरावर आहे. कामोठे येथे श्रीमद् भागवत कथा सोहळा उत्साहात पार पडत आहे.

ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीडच्या रजदूतांनी या गौरवपुर्ण सोहळ्यामध्ये सहभागी होवून या अभियानाचा आवाज सर्व साम्यान्यापर्यंत आणि विशेष पद्धतीने भक्तगणांना आणि स्वयंम कथा वाचक महाराजांना हि दिला. भक्तगणांना आणी रुची असलेल्या सभोवतालच्या नागरिकांना या माध्यमातून खा खेळा वाचा अभियानाचा आवाज पोहचवण्यात राजदूताना यश आले. खा खेळा वाचा अभियानाचे राजदूत अजित पाण्डेय यांनी ही व्यवस्था पार पाडली.

# स्वच्छता अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी क्षमतावृद्धी कार्यशाळा



**नवी मुंबई : बातमीदार**

‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’चे टूलकिट नुकतेच केंद्रीय शहरी विकास मंत्रालयाचे मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी प्रकाशित केले असून त्यानुसार स्वच्छताविषयक कामांची अंमलबजावणी महापालिका क्षेत्रात प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नमुंमपा स्वच्छता अधिकारी व कर्मचारी यांची क्षमतावृध्दी कार्यशाळा वाशी येथील महात्मा जोतिबा फुले भवनात उत्साहात झाला.

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सातत्याने अग्रक्रमावर राहिलेल्या देशातील मोठया शहरांची सुपर स्वच्छ लीग ही विशेष कॅटेगरी यावर्षी निर्माण करण्यात आली असून त्यामध्ये नवी मुंबईसह इंदौर व सुरत अशा एकूण तीन शहरांचा समावेश आहे. अशा विशेष कॅटेगरीमध्ये आपल्या नवी मुंबई शहराचा समावेश असून ही सर्वांसाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट असल्याचे सांगत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी त्यामुळे आपले मानांकन टिकवून ठेवण्याची जबाबदारी वाढली असल्याचे सांगितले.

यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाप्रमाणेच सर्व विभागांचा सक्रीय सहभाग अपेक्षित असल्याचे सांगत त्यांनी स्वच्छ सर्वेक्षणासाठी येणा-या परीक्षकांच्या नजरेने आपल्या कामांची पाहणी करावी व एखाद्या ठिकाणी त्रुटी आढळल्यास त्या संबधितांच्या त्वरीत निर्देशनास आणून देउन दुरुस्त करुन घ्याव्यात असेही त्यांनी निर्देशित केले.

स्वच्छता व सुशोभिकरण ही सर्वांची सामुहिक जबाबदारी असून आवश्यकतेनुसार परस्परांशी समन्वय राखून तत्परतेने सुधारणा करुन घ्याव्यात असेही त्यांनी सूचित केले. निर्मितीच्या ठिकाणी नागरिकांच्या पातळीवर कचरा वर्गीकरणाचे प्रमाण वाढवावे व नागरिकांपर्यंत स्वच्छता कार्याविषयी जास्तीत जास्त प्रमाणात माहिती पोहचवून नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादावर भर द्यावा असेही त्यांनी सांगितले.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये स्वच्छ भारत मिशन मार्फत काही मानके बदलली असून परीक्षण व गुणांकनाच्या पध्दतीतही काही प्रमाणात बदल झालेला आहे. या टूलकिटची सविस्तर माहिती संबधित स्वच्छता अधिकारी व कर्मचा-यांना व्हावी व त्यानुसार स्वच्छता कार्याला अधिक सुनियोजितपणा यावा आणि गतीमानता प्राप्त व्हावी या करिता आजच्या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ २ उपआयुक्त संतोष वारुळे यांनी सांगितले.

या वेळी योगेश जाधव यांनी स्वच्छ सर्वेक्षण २०२४ टूलकिटमधील गुणांकन पध्दती व त्यादृष्टीने अवलंबवयाची कार्यपध्दती याविषयी सादरीकरणाव्दारे बाबनिहाय सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी अतिरिक्त आयुकत सुनिल पवार, परिमंडळ १ उपायुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २ उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन विभाग परिमंडळ १ उपायुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ उपआयुक्त संतोष वारुळे, सहा.आयुक्त डॉ. अमोल पालवे, प्रबोधन मवाडे, मुख्य स्वच्छता अधिकारी सतीश सनदी व इतर स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, उपस्वच्छता निरीक्षक व इतर अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ ला सामोरे जाताना निश्चय केला नंबर पहिला हे आपले ध्येयवाक्य साध्य करण्यासाठी सर्व घटकांनी एकत्र येउुया आणि संकल्प पूर्ण करुया असे आवाहन यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी केले.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : साळाव-रोहा रस्त्यावर कुंभोशी गावाजवळील झाडावर ३०पेक्षा जास्त मधमाशांची पोळी आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात मधमाशांची पोळी असल्याने पर्यटक पाहण्यासाठी आवर्जून थांबतात.** (छाया : सुधीर नाझरे)

# पेणमध्ये पेट्रोल बॉम्ब फेकणाऱ्याला कोठडी



**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील पेट्रोल बॉम्ब हल्ल्यातील आरोपी समीर नरदास पाटील (रा. वढाव, ता. पेण) याला पोलिसांनी ४८ तासांत ताब्यात घेतले. त्याला न्यायालयात हजर केले असता ११ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पेण शिक्षण महिला समितीच्या इंग्लिश मीडियम स्कूल (गुरुकुल शाळा)मधील नववीच्या विद्यार्थ्यांचा त्याच शाळेतील मैदानावर स्काउट गाईड कॅम्प आयोजित करण्यात आला होता. त्याकरिता शाळेच्या मैदानावर सहा तंबू उभारण्यात आले होते. १ फेब्रुवारी रोजी कॅम्पचे सर्व कार्यक्रम झाल्यानंतर रात्री १च्या सुमारास सर्व विद्यार्थी, शिक्षक व स्टाफ गुरुकुल शाळेच्या वर्ग खोल्यांमध्ये झोपण्यास गेले होते. वॉचमनला पहाटे ४च्या सुमारास ग्राउंडवर काहीतरी जळत असल्याचे दिसून आले. त्याने ही माहिती शिक्षक स्टाफला दिली. आगीत एक तंबू जळून खाक झाला. सुदैवाने यात जीवित हानी झाली नाही.

या घटनेची माहिती मिळताच पेण पोलीस ठाण्यात बीएनएस ३२४,(३), ३२४(३), ३२४ (६), ३२६ (एफ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक समद बेग व गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अंमलदार करीत होते. गुन्हा शाळेच्या आवारात स्काउट गाईडच्या शिबिरावेळी घडलेला असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याची गंभीर दखल घेउन ल्हिा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासकामी मार्गदर्शन केले तसेच अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे व उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांनीही सक्त सूचना दिल्या. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी पेण पोलीस ठाण्यातील वेगवेगळी एकूण तीन पथके तयार करुन या गुन्ह्याच्या तपासात काहीएक सुगावा नसताना व गुन्हा कोणत्या हेतूने घडला आहे याबाबत माहिती नसताना घटनास्थळाच्या मार्गावरील सुमारे ५५ सीसीटीव्ही कॅमेरे तपासले, पण आरोपीने गुन्हा करण्याकरिता छुप्या रस्त्याचा वापर केला असल्याने आरोपीची साखळी जुळून येत नव्हती. ती पोलिसांनी जुळवून आणली व गुन्ह्यातील साक्षीदारांची पडताळणी करुन गोपनीय तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे अथक प्रयत्न करून कौशल्यपूर्वक तपासाच्या आधारे ४८ तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणला.

या गुन्ह्यातील आरोपी समीर नरदास पाटील हा पेण तालुक्यील वढाव येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले असून त्याला अटक करण्यात आली आहे. आरोपी हा गुरुकुल शाळेच्या बाजूने जात असताना त्याला शाळेतील विद्यार्थ्यांचा गोंगाट ऐकायला. ही गोष्ट त्याच्या मनात चीड आणणारी होती आणि म्हणून आरोपीने शाळेचे काहीतरी नुकसान करण्याचे ठरवले. त्यातून त्यांने हे कृत्य केल्याचे समोर आले आहे.

पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या सूचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे उपनिरीक्षक समद बेग, राजेश पाटील, हवालदार सचिन व्हस्कोटी, अजिंक्य म्हात्रे, संतोष जाधव, प्रकाश कोकरे, अमोल म्हात्रे, सुशांत भोईर, शिपाई गोविंद तलवारे यांनी या कारवाईत सहभाग घेत आरोपीला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता ११ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी पेण पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# रोह्यात रस्त्यावरच गाड्या पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरातील मुख्य रस्त्यावर मालवाहतुकीसह, दुचाकी व चारचाकी वाहने उभी राहत असल्याने वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. याचा त्रास नागरिकांना सोसावा लागत आहे. मुख्य रस्ते काही ठिकाणी पार्किंग झोन झाल्याचे दिसून येते. त्यामुळे वर्दळीच्या वेळी वाहतूक कोंडी होते.

रोहा शहरातील नेहमीच वर्दळीचे असलेले मार्ग म्हणजे रोहा-कोलाड रोड, वीर सावरकर रोड, आडवी बाजारपेठ, दमखाडी ते महेंदळे हायस्कूल व राम मारुती चौक ते मेहेंदळे हायस्कूल हे आहेत.

रोहा-कोलाड रोड नव्याने काँक्रीटीकरण करण्यात आला आहे. त्यातच दोन्ही रस्त्याच्या मधोमध डिव्हायडर बसवण्यात आले आहे. त्यामुळे वाहतूक सुरळीत होईल अशी अपेक्षा होती, परंतु या मार्गावर अधूनमधून चारचाकी व दुचाकी वाहने उभी करण्यात येत असल्याने सातत्याने या मार्गावर वाहतूक कोंडी होते. या मुख्य कारणासह या मार्गावर साईडपट्टी काही ठिकाणी भरलेली नाही. गटार व रस्त्याच्या मधला पॅसेज व्यवस्थित केल्यास काही प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

वाहतूक कोंडीस अरुंद रस्ता हे महत्त्वाचे कारण आहे. यामध्ये प्रामुख्याने वीर सावरकर रोड व तीन बत्ती नाका ते राम मारुती चौक होय. हे दोन्ही रस्ते अरुंद आहेत. त्यातच या रस्त्याच्या बाजूला दुचाकी व चारचाकी वाहने उभी राहत असल्याने दोन गाड्या ये-जा करत असताना वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. बाजारहाटासाठी आलेले नागरिक बिनधास्तपणे आपली वाहने रस्त्यावर उभी करीत असल्याने वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. विशेषतः वीर सावरकर रोडवर नेहमीच वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. यालाच लागत असलेल्या रोहा एसटी स्टँड ते वीर सावरकर रोड हा मार्गही नेहमीच वाहतूक कोंडीने त्रस्त असतो.

महत्त्वाचे म्हणजे रोहा शहरातील काही चौक वाहनतळ झाल्याचे दिसून येते. राम मारुती चौक ते मेहेंदळे हायस्कूल व दमखाडी ते मेहेंदळे हायस्कूल या मार्गावर अवैधरित्या अनेक गाड्या उभ्या असल्याचे दिसून येते. दुसरीकडे धनगरआळी ते अंधारआळी या मार्गावरही काही ठिकाणी गाड्या उभ्या असल्याच्या दिसून येत आहेत. अनेक सोसायट्यांमध्ये पार्किंग नसल्याने गाड्या बिनधास्तपणे रस्त्यावर उभे असल्याचे दिसून येते. हीच काहीशी परिस्थिती भाटे वाचनालय ते हनुमान टेकडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिसून येते. शहरातील काही ठराविक भागांमध्ये रस्त्यावरच वाहने उभी करण्यात येत असतात ही वाहने अस्ताव्यस्त उभी असलेली दिसून येतात. रोहा शहरात येणाऱ्या खासगी बसेस व व्यावसायिकांसाठी आणण्यात येत असलेल्या मालवाहतूक ट्रान्सपोर्टच्या गाड्या यामुळे सातत्याने वाहतूक कोंडी होताना दिसत आहे.

रोहा शहराचा विकास झपाट्याने होत आहे. सुंदर शहर बनवण्याची संकल्पना खासदार सुनील तटकरे यांची आहे. या संकल्पनेला साकार करण्यासाठी रोहा शहरातील रस्ते रुंद करणे आवश्यक आहे. शहरातील काही भागात सम विषम पार्किंग कृतिशील राबवणे आवश्यक आहे. दुसरीकडे नागरिकांना बाजारहाटास येण्यासाठी नगरपालिकेने केलेल्या पार्किंग ठिकाणी आपल्या चारचाकी गाड्या पार्क करण्यासाठी सवय लावणे आवश्यक आहे.



# जळीत घरातील कुटुंबाला पतसंस्थेतर्फे आर्थिक मदत



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेले उमेश गोबरे व अंकुर गोबरे यांच्या इमारतीला १९ डिसेंबर २०२४ रोजी आग लागली आणि त्यामध्ये त्यांचे घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडून आर्थिक नुकसान झाले होते. जय श्री राम नागरी पतसंस्थेने आपला खारीचा वाटा उचलून गोबरे कुटुंबीयांना माणुसकीच्या नात्याने आर्थिक मदत केली आहे.

जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे उमेश गोबरे यांना ३० हजार रुपये आणि अंकुर गोबरे यांना २० हजार रुपये असे एकंदर ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य करून या कुटुंबाला मदतीचा हात दिला आहे.

या वेळी पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, उपाध्यक्ष मेघराज जाधव, कोषाध्यक्ष बाळकृष्ण कासार, सचिव सुनील विरकुड, संचालक समीर उपाध्ये, सरव्यवस्थापक संजय ठाकूर, व्यवस्थापक विनोद जोशी, निकेतन मसाल, बिपीन चोरघे, उमेश भायदे आदी उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी यांनी सांगितले की, सामाजिक जाणीव ठेवून विविध उपक्रम श्रीराम पतसंस्था राबवत असते. यामध्ये नेत्र तपासणी शिबिर, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर तसेच संकटात सापडलेले नागरिक यांना वेळीच मदत करून आम्ही सामाजिक बांधिलकी जपतो.

## शिक्षक संघ वर्धापन दिन, गुणगौरव सोहळा

**माणगाव : बातमीदार**

प्राथमिक शिक्षक संघ शाखा रायगडचा वर्धापन दिन आणि गुणवंतांचा गौरव सोहळा ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कुणबी सभागृह माणगाव येथे होणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षक संघाचे जनरल कौन्सिल सदस्य तथा रायगड जिल्हाध्यक्ष सोपान चांदे यांनी दिली.

या कार्यक्रमाला मंत्री भरतशेठ गोगावले, मंत्री आदिती तटकरे यांचाही संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे.

# दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**पेण : प्रतिनिधी**

कर्मचारी सेवानिवृत्त झाले की घरी बसतात व आपल्या कौटुंबिक जीवनात रमतात, पण याला अपवाद आहेत, ते रामवाडीचे हभप कृष्णा वर्तक गेली १४ वर्षे दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना भेटी देऊन त्यांना मार्गदर्शन करतात. त्यांनी नुकताच रामवाडी समर्थ नगर येथील साई क्लासेस व श्री समर्थ क्लासेसला भेट दिली आणि येथील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले.

कृष्णा वर्तक यांनी शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाबरोबर अनेक शैक्षणिक पैलू विद्यार्थ्यांना समजून सांगितले. परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी सावध कसे असावे, विद्यार्थ्यांचे ध्येय काय असावे, शैक्षणिक पद्धत कोणती असावी, स्वतःचे वेळापत्रक कसे असावे, परीक्षेच्या कालावधीत नेमका कोणता अभ्यास करावा, आदर्श पेपर म्हणजे काय, पास होण्यासाठी सोप्या आयडिया, जीवनमूल्ये म्हणजे काय, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून शैक्षणिक दिशा देऊन ध्येयापर्यंत कसे जावे याबाबत मार्गदर्शन केले.

आदर्श केंद्रप्रमुख म्हणून रायगड जिल्हा गौरव, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचा पुरस्कार वर्तक यांना मिळाला आहे. त्यांनी शेवटी विद्यार्थ्यांना लेखन साहित्य देऊन शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी वर्तक यांचे आभार मानण्यात आले.

# साजगाव येथील पुरातन तलाव मोजतोय अखेरची घटका

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडला आपली राजधानी बनविली. खालापूर तालुक्यातील उंबरखिंड येथे झालेल्या लढाईत शिवरायांनी सहभाग घेतला होता. ते खालापूर तालुक्यात अनेक भागात येऊन गेल्याच्या खुणा आढळतात. पेशव्यांचे वास्तव्यही खालापूरमध्ये होते. अशा या खोपोलीतील कांकण तलाव याची साक्ष देत असून साजगाव येथील विठ्ठल मंदिरासमोर असलेला पेशवेकालीन घोडे तलावही यापैकीच एक आहे. हा तलाव सध्या अखेरची घटका मोजत आहे



छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडला आपली राजधानी बनवून हिंदवी स्वराज्याचा कारभार रायगडावरून केला. खालापूर तालुक्यातील चावणी परिसरात असलेल्या उंबरखिंडीत मुगल सरदार करतलब खानाचा पाडाव करण्यासाठी महाराजांनी स्वतः लढाईत सहभाग घेत गनिमी काव्याने करतलब खान व महिला सरदार रायबागन यांच्यासह मोगलांच्या ३० हजार सैन्याचा पराभव करून करतलब धडा शिकविला होता. पुणे प्रातांतून कोकणात येण्यासाठी महाराजांनी खालापूर तालुक्याचा वापर केल्याच्या अनेक खुणा आजही सापडतात.

कल्याणचा खजिना लुटल्यानंतरही महाराजांनी खालापूर येथे मुक्काम केला होता. या खजिन्यातील दाग-दागिने येथील साबाई मंदिराच्या परिसरात ठेवल्याचे बोलले जाते. शिवरायांप्रमाणेच पेशव्यांचेही या परिसरात वास्तव्य राहिले आहे. पेशव्यांच्या पत्नीने बांधलेला खोपोलीतील कांकण तलाव व शंकराचे मंदिर याची साक्ष देत आहे. खोपोलीत बांधलेल्या तलावातील पाण्याचा वापर त्या वेळी पिण्यासाठी व हत्तीस्नानासाठी केला जात असल्याचे सांगितले जाते.

खोपोलीपासून जवळच असलेल्या साजगाव येथील विठ्ठल मंदिरासमोरील जागेत घोड्यांना पाणी पिण्यासाठी बांधलेला घोडे तलाव पेशवेकालीन बांधकामाचा उत्कृष्ट नमुना म्हणून दिमाखात उभा आहे.या तलावात असलेल्या पाण्याचा आजही वापर केला जात आहे. साजगाव येथे दरवर्षी भरणाऱ्या यात्रेत येणाऱ्या भाविकांसाठी हा तलाव म्हणजे मोठा आधार असतो. सुंदर अशा कोरीव दगडांमध्ये शेकडो वर्षांपूर्वी या तलावाची निर्मिती झाल्याचे तलावात असलेल्या शिलालेखांवरून स्पष्ट होते. वन खात्याच्या जागेत अनेक वर्ष ऊन, पाऊस, थंडी, वारा अंगावर घेऊन उभा असलेला हा तलाव सध्या अखेरची घटका मोजत आहे. तलावाच्या भिंती आता कोसळू लागल्या असून या तलावाकडे वेळीच लक्ष दिले नाही तर अनेक वर्षांचा इतिहास नामशेष होण्याची भिती आहे.

काही वर्षांपूर्वी खोपोली नगरपालिकेच्या माध्यमातून तत्कालीन नगराध्यक्ष रामदास शेंडे यांनी पुढाकार घेऊन तलावातील गाळ काढून काही प्रमाणात डागडुजी करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र त्याला अनेक वर्ष लोटल्याने पुन्हा या तलावाची दुरूस्ती करण्याची गरज निर्माण झाली आहे. या तलावाच्या शेजारीच असलेली पुरातन विहिरही सध्या अशाच अवस्थेत आहे.

# पेण येथे पोपटी काव्यसंमेलन रंगले



**नागोठणे : बातमीदार**

साहित्यसंपदा आयोजित पोपटी काव्यसंमेलन पेण येथील अलंकार साळुंखे यांच्या रमाई फार्महाऊस येथे पार पडले.

मराठी भाषा, साहित्य प्रचार, प्रसार आणि संवर्धन या हेतूने साहित्यसंपदाची स्थापना २०१८ साली झाली असून या माध्यमातून काव्य, कथा, गझल लेखन व सादरीकरण कार्यशाळा आणि साहित्य संमेलने मुंबई, कोल्हापूर, नागपूर येथे पार पडली आहेत. नवसाहित्यिकांना परवडतील अडा किमतीत उत्तम दर्जाची पुस्तकेसुद्धा साहित्यसंपदा प्रकाशनाच्या माध्यमातून प्रकाशित केली जातात.

पेण व रायगड भागातील साहित्यिकांनी एकत्र यावे आणि मराठी साहित्यावर चर्चा होऊन पुढील साहित्य वाटचालीस मार्गदर्शन लाभावे याकरिता या पोपटी काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, असे साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांनी सांगितले.

या काव्यसंमेलनास मराठी साहित्य मंडळ पेण संस्थेचे अध्यक्ष डॉ. देवीदास बामणे, उपाध्यक्ष प्रा. सतीश पोरे, पेण विभागात गेली अनेक वर्षे साहित्य चळवळीस आपले बहुमूल्य योगदान देणाऱ्या माजी अध्यक्ष विभावरी जोशी आणि माजी कार्यवाह बाळकृष्ण कमळकर उपस्थित होते. त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्त्या ॲड. तेजस्विनी नेने, रायगडभूषण लेखक-कवी रमेश धनावडे यांची विशेष उपस्थिती कार्यक्रमास लाभली.

डॉ.प्रा. राजेंद्र गोरे, सामाजिक कार्यकर्त्या मोहिनी गोरे, साहित्यसंपदा गझलकारा स्मिता हर्डीकर, तेजस्विनी फाउंडेशन संस्थपिका जीविता पाटील, कवी-लेखक अरुण देव यांनी आपल्या कवितांनी पोपटी काव्यसंमेलनाची रंगत अधिक वाढवली. कार्यक्रम रंगतदार झाला, असे मत उपस्थित रसिक पूनम धनावडे, सुमिता पोरे, अमित हर्डीकर यांनी व्यक्त केले. रमेश धनावडे यांच्या खुमासदार मिश्किल चारोळ्या, दुरोळ्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली. रेणुका साळुंखे यांचे विशेष योगदान पोपटी काव्यसंमेलनास लाभले.

## अरुण पवार यांना पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमधील ज्येष्ठ पत्रकार अरुण पवार यांना दीपक शिंदे स्मृती उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार तज्ज्ञ विश्लेषक हेमंत देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात बुधवारी (दि.५) प्रदान करण्यात आला.

पवार हे गेली ३५ वर्ष पत्रकारिता करीत असून लोकनेते अशोकदादा साबळे पतसंस्थेचे चेअरमन असून शिपुरकर आणि वाघरे या इंग्रजी माध्यम शाळेचे चेअरमन म्हणून काम करीत आहेत. पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# मेथा विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**माणगाव : बातमीदार**

निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ग.रा. मेथा माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या मार्च १९८३च्या वर्गातील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात एस.के. वॉटर पार्क येथे झाला.

या मेळाव्यामध्ये त्या वेळीच्या बॅचमधील विद्यार्थ्यांपैकी ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मार्च १९८३नंतर ४२ वर्षांनी हे सर्व विद्यार्थी मित्र-मैत्रिणी एकत्र जमले होते. या मेळाव्यासाठी ग.रा. मेथा माध्यमिक विद्यालयातील माजी मुख्याध्यापिका जयश्री देशपांडे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून लाभल्या होत्या. सर्वप्रथम सर्वांनी राष्ट्रगीत व प्रार्थना जुन्या आठवणी जागृत केल्या.

दिवंगत शिक्षक व विद्यार्थी मित्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर देशपांडे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी वसंत पंचमी ही सरस्वती देवीचा प्रकट दिन तसेच संत तुकाराम महाराजांची जयंती असे या दिवसाचे व धार्मिक व आध्यात्मिक महत्व विषद केले. वसंत ऋतूचे आगमनदेखील होत असल्याने आजच्या दिवसाला विशेष महत्त्व असल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. इतक्या वर्षांनी जिवलग मित्र परिवार भेटल्याने अनेक जण मनोगत व्यक्त करताना भावूक झाले. त्यानंतर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रमासह उत्तम भोजनाचा आस्वाद घेऊन व उपस्थितांना सन्मानचिन्हाचे वाटप करून स्नेहमेळाव्याची सांगता करण्यात आली.






# कबड्डीत दम आणि संयम महत्त्वाचा -खासदार तटकरे

**पेण : प्रतिनिधी**

कबड्डीत दम आणि संयम महत्त्वाचा असतो. ज्याला त्यावर नियंत्रण ठेवता आले, तो कबड्डीमध्ये यशस्वी होतोच. त्यामुळे या दोन्ही गोष्टी कबड्डीप्रमाणे आयुष्यातही महत्त्वाच्या आहेत, असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी शुक्रवारी (दि. ७) केले

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि वैकुंठ पाटील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पेण तालुक्यातील वाशी येथे जय भवानी आणि वरसुआई संघ यांच्या सहकार्याने पुरुष व महिला गटाची जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन खासदार तटकरे यांच्या छत्रपती संभाजी महाराज मैदान वाशी वढाव येथे हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

खासदार सुनील तटकरे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, मी आज राष्ट्रवादीचा खासदार म्हणून कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनासाठी आलो नाही, तर महाराष्ट्र असोसिएशनचा उपाध्यक्ष म्हणून आलो आहे. जिल्हा अजिंक्यपदाची स्पर्धा आज वाशी परिसरात भरवून वैकुंठ पाटील यांनी कबड्डी क्षेत्रातील चांगला अध्याय सुरू केला आहे. आज क्रिकेटच्या

## जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे शानदार उद्घाटन

अतिखेळामुळे कबड्डीकडे दुर्लक्ष होत आहे, पण कबड्डीचे टॅलेंट हे ग्रामीण भागात आहे. कोण कोठे जन्माला येतो त्यापेक्षा तो आपल्या जन्मभूमीसाठी काय करतो हे महत्त्वाचे आहे. स्व. विजय म्हात्रे यांचे नाव घेतल्याशिवाय रायगड कबड्डीचा इतिहास लिहिला जाणार नाही. त्यांना महाराष्ट्र संघाचा नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यांनी क्रीडा क्षेत्रातील मानाचा शिवछत्रपती पुरस्कारदेखील त्यांनी आपल्या कर्तृत्वाने पटकावला. त्यामुळे कबड्डीकडे राजकारणविरहीत पाहणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले

प्रास्ताविकात वैकुंठ पाटील यांनी म्हटले की, कबड्डी खेळात ही माझी सुरवात असून या भागात क्रीडा अकॅडमी चालू करण्याचा मानस आहे. यासाठी सर्वांची साथ गरजेची आहे. क्रिकेटसाठी जसे मानधन दिले जाते; त्याप्रमाणे कबड्डी खेळाडूंनाही मानधन मिळणे गरजेचे आहे. याकरिता खासदार सुनील तटकरे यांनी प्रयत्न करावे, अशी मागणीही पाटील यांनी केले.

उद्घाटन समारंभासाठी महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे सचिव अस्वाद पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन कार्यवाह चित्रा पाटील, मिलिंद पाटील, जे.जे. पाटील, दयानंद भगत, शरद कदम, जितू ठाकूर, विजय कदम, योगेश पाटील यांच्यासह क्रिडाप्रेमी उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश थवई यांनी केले.

स्पर्धा ७, ८ व ९ फेब्रुवारी अशी तीन दिवस खेळली जाणार असून या स्पर्धेचे बक्षीस वितरण खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील आदींच्या हस्ते होणार आहे.

# पेणमध्ये होणार इनडोअर क्रिकेट मैदान

## ‘आरडीसीए’चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन

**पेण : रामप्रहर वृत्त**

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडिअमच्या बाजूला इनडोअर क्रिकेट मैदानाचे भूमिपूजन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन समारंभाला माजी नगरसेवक शोमेर पेणकर, नगरसेवक संतोष पाटील तसेच अरुण शिंदे, संजय महात्रे, रवींद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आरडीसीए अध्यक्ष अनिरुध्द पाटील यांनी सांगितले की, आज धावपळीच्या जीवनामध्ये क्रिकेटपासून अनेक क्रिकेटप्रेमी दूर चाललेले आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात प्रथमच आपण इनडोअर खेळपट्टी तयार करत आहोत, जेणेकरून रात्रीच्या वेळी अथवा सकाळी पहाटे क्रिकेटप्रेमी आपले क्रिकेट खेळण्याचे स्वप्न पूर्ण करतील.

ते पुढे म्हणाले, आज भविष्यातील एका वैशिष्ट्यपूर्ण वास्तूचे भूमिपूजन झाले आहे. यासाठी खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील हे आमच्याबरोबर आहेत. त्यामुळे निधीची कमतरता भासणार नाही. माजी नगरसेवक शोमेर पेणकर नगसेवक संतोष पाटील तसेच अरुण शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.



# खानाव येथे आजपासून आमदार चषक क्रिकेट स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष आणि माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार चषक प्रकाशझोतातील टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन खानाव येथे करण्यात आले आहे. ही स्पर्धा ८ ते ११ फेब्रुवारीपर्यंत रंगणार आहे.

स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेतील विजेत्या संघाला एक लाख रुपये व भव्य चषक, उपविजेत्यास ५० हजार रुपये, तृतीय क्रमांक व चतुर्थ क्रमांकास प्रत्येकी २५ हजार रुपये, मालिकावीरास मोटरसायकल तसेच उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज व क्षेत्ररक्षकाला आणि प्रेक्षकांसाठी आकर्षक बक्षिसे असणार आहेत. या स्पर्धेचा क्रीडारसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धा आयोजक अॅड. शशिकांत दिसले यांनी केले आहे.

# जयंत दबडे यांचे महसूल क्रीडा स्पर्धेत यश

## ■ जिल्हाधिकारी किसन जावळेंकडून गौरव

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत तहसीलदार कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या जयंत दबडे यांनी रायगड जिल्हा महसूल क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. याबद्दल त्यांना रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते पदके देऊन गौरविण्यात आले.




अलिबाग येथील आरसीएफ मैदानावर झालेल्या या स्पर्धेत जयंत दबडे यांनी २०० मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक, तर थाळीफेक, गोळाफेक व भालाफेक या तीन क्रीडा प्रकारांमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांचा जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते रौप्य व कांस्यपदक देऊन गौरव करण्यात आला. या दमदार कामगिरीमुळे दबडे यांची सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या कोकण विभागीय महसूल क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दबडे यांनी आपल्या यशाचे श्रेय उपविभागीय अधिकारी प्रकाश सकपाळ आणि तहसीलदार धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनासोबतच सर्वांकडून मिळालेल्या प्रोत्साहनाला दिले आहे. त्यांनी सहकारी स्टाफसह जिल्हाधिकारी किसन जावळे, उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे, उपविभागीय अधिकारी प्रकाश सकपाळ व तहसीलदार जाधव यांचे आभार मानले. या उल्लेखनीय यशाबद्दल अनेकांनी दबडे यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# तिरंदाजीत महाराष्ट्राला सर्वसाधारण विजेतेपद

**डेहराडून : वृत्तसंस्था**

सात दिवस चाललेल्या तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी तीन सुवर्ण, एक रौप्य व एक कांस्य अशा एकूण पाच पदकांची लयलूट करीत ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

इंडियन राऊंड प्रकारात शुक्रवारी (दि. ७) महाराष्ट्राच्या संघाने ओडिशाचा पराभव करून कांस्यपदक जिंकले. त्यानंतर गौरव चांदणे व भावना सत्यगिरी या महाराष्ट्राच्या जोडीने इंडियन राऊंडच्या मिश्र दुहेरीत बाजी मारत सुवर्णपदकाने तिरंदाजी स्पर्धेचा गोड शेवट केला. राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमवर ही स्पर्धा पार पडली.

# सूर्यकुमार आणि शिवम मुंबई रणजी संघात परतले

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई रणजी संघाने मेघालय संघाला साखळी फेरीत तब्बल ४५६ धावांनी दणदणीत पराभूत करत २०२४-२५च्या रणजी ट्रॉफी स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली. एलिट ए गटातून मुंबई व जम्मू काश्मिर हे संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहचले. आता हाच मुंबई संघ एलिट सी ग्रुपचा टॉपर असलेल्या हरियाणा संघाविरुद्ध दोन हात करणार आहे. भारतीय संघाकडून खेळलेले अनेक दिग्गज क्रिकेटपटू या वेळी मुंबई संघाचा भाग असतील.

जम्मू काश्मिरविरुद्ध झालेल्या सहाव्या साखळी सामन्यात मुंबईकडून यशस्वी जयस्वाल, रोहित शर्मा, अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर आणि शिवम दुबे खेळले होते, परंतु या सामन्यात मुंबईला पराभवाला

## रणजी ट्रॉफीमध्ये हरियाणाविरुद्ध उतरणार मैदानात

सामोरे जावे लागले होते. त्यानंतर मेघालयविरुद्ध अजिंक्य व शार्दुल हेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू खेळताना दिसले, तर शिवम हा इंग्लंडविरुद्ध टी-२० मालिकेत खेळताना दिसला.

आता टी-२० मालिका संपल्यामुळे व वनडे संघात निवड न झाल्यामुळे सूर्यकुमार आणि शिवम हे मुंबई रणजी संघात परतले आहेत. हरियाणाविरुद्धचा सामना रोहतकच्या बन्सिलाल स्टेडियमवर ८ ते १२ फेब्रुवारीदरम्यान होणार आहे. ४२ वेळा रणजी ट्रॉफी जिंकणारा मुंबई संघ यंदा आपल्या ४३व्या विजयासाठी प्रयत्नशील आहे.

# माणगावमध्ये नामदार आदिती चषक क्रिकेट स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या आमदार तथा राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या नावाने माणगाव येथील निळगुण फाटा येथील मैदानावर १६ व १७ फेब्रुवारी रोजी नामदार आदिती चषक प्रकाशझोतातील क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन १६ रोजी सायंकाळी ७ वा. मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत होणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन दिल दोस्ती दुनियादारी ग्रुप व माणगाव शहर असोसिएशन यांच्यामार्फत करण्यात आले आहे. विशेष आकर्षण प्रसिद्ध सेलिब्रेटी, नामवंत क्रिकेटपटू ऋतुराज गायकवाड असणार आहे.

प्रथम क्रमांक विजेत्या दोन लाख एक रुपये, द्वितीय एक लाख एक रुपये, तृतीय २५ हजार रुपये, चतुर्थ क्रमांक २५ हजार रुपये आणि चारही विजेत्यांना आकर्षक चषक देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे वैयक्तिक बक्षिसांमध्ये संघमालकास बाईक, स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूला एलईडी टीव्ही, उत्कृष्ट फलंदास, गोलंदाज व क्षेत्ररक्षक सायकल अशी बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहेत.

स्पर्धेत १६ संघांचा समावेश असून आठ संघ रायगड जिल्हा मर्यादित, तर उर्वरित आठ संघ खुल्या गटातून खेळविण्यात येतील. नॉकआऊट पद्धतीने होणार असून स्पर्धेचे युट्युब चॅनलवरून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com